# गलतीकरांस पत्र

**१,** **पौल,** येशू ख्रिस्ताचा प्रेषित ज्यांना परमेश्वर बापाने मेलल्यातून उठविले, जो मनुष्याद्वारे नव्हे तर परमेश्वराद्वारे
२,३ पाठवलेला आहे. **हे पत्र** त्या सर्व मंडळयांसाठी, त्या सर्व भावांकडून जे माझया सोबत आहेत. **आपल्या** स्वर्गिय
४ बापापासून आणि प्रभु येशू ख्रिस्तापासून तुम्हांस शांति प्राप्त होवो. **ज्यांनी** आमच्या पित्याच्या इच्छेच्या आधारे आमच्या
५ अपराधांसाठी स्वत:स दिले यासाठी की आम्हाला या दुष्ट जगापासून सोडवले. **त्यांनाच** प्रशंसा, सन्मान आणि स्तुति
६ सर्वदा मिळो. असेच होवो. **मला** आश्चर्य वाटते की ज्या येशू ख्रिस्ताने आपल्या असीम कृपेने तुम्हास पाचारण केले
७ त्यापासून वळून तुम्ही वेगळया प्रकारच्या विचार प्रणालीने प्रभावित होत आहात. **ते** एक शुभवर्तमान नाही; परंतु
८ काही लोक तुम्हाला त्रास देत आहेत आणि येशूच्या सुवार्तेला भ्रष्ट करत आहेत. **जर** आम्ही किंवा स्वर्गातला एखादया

---

१:१ **''प्रेषित''**- मत्तय १०:२; रोम १:१.

**''मेलेल्यातून''**- मत्तय २८:६. या गोष्टीकडे लक्ष दयावे की परमेश्वर आणि येशू ख्रिस्तात पौल कशाप्रकारे वेगळे वेगळे दाखवतो. ईश्वरत्वात ते दोघेहि आहेत; पण ते दोन भिन्न व्यक्ति देखील आहेत. मत्तय ३:१६,१७, योहान १७:१ इत्यादि.

१:२ तुर्कस्तानात गलतीया एक मोठे क्षेत्र होते. इकुन्या, लुस्त्र आणि दर्बे (प्रेषित १४:१-२०) याच राज्यात होते.

१:३ रोम १:७ ''असीम कृपा'' या पत्राचे मुख्य शब्द होत. १:३,६,१५;२:९,२१;३:१८; ५:४; ६:१८. पौल स्पष्टपणे सांगतो की कृपेच्या शुभवर्तमानाचा अर्थ काय आहे.

१:४ **''आमच्या अपराधांकरता''** यशया ५३:६,८,१०; मत्तय २६:२८; योहान १:२९; रोम ३:२४,२५ १ करिंथ १५:३; २ करिंथ ५:२१; इब्री ९:२८; १पेत्र २:२४; ३:१८.

**''सोडवावे''** येथे ख्रिस्ताच्या मृत्यूचे एक विशेष कारण आहे. ही परमेश्वराने निवडलेली पद्धत होती; यासाठी की जगाची दुष्टता व बेडयांपासून लोकांची मुक्ति व्हावा ज्यात ते बांधलेले होते. ख्रिस्ताला रोम ११:२६ यात ''सोडवणारा'' म्हटले गेले आहे. मत्तय १:२१; लूक ४:१८; कलस्सै १:१३; तीताला १:२४; इब्री २:१५ शी जुळवा. परमेश्वरापासून दूर करणाऱ्या प्रत्येक गोष्टीपासून येशू लोकांना मुक्त करतात. ५:१; योहान ८:३६; रोम ६:१६,१८.

**''दुष्ट जग''** वाईट युग या युगात इच्छा, आदर्श (जसे प्रत्येक युगात असते) दुष्ट-वाईट आहेत. पहा योहान ३:१९;७:१७; रोम ३:१९,२३;१२:२; १योहान २:१६; ५:१९. आपण अशाप्रकारे वाचवले जातो. आपल्या अपराधांपासून सोडवण्यासाठी तसेच दोषमुक्त करण्यासाठी येशूने प्राण दिले. (रोम ८:१) आपला पालट झाल्यावर आपण ख्रिस्तावर भरंवसा ठेवतो, ते आम्हाला क्षमा करतात व यहोवा परमेश्वराचया आत्मा आपल्यात येतो. त्यावेळी आपणास बळ प्राप्त होते; यासाठी की जगिक गोष्टींचा त्याग व्हावा व आपण परमेश्वरासाठी जगावे. येशू जगिक बंधनांच्या शक्ति पासून आपणास शुद्ध करतील, शेवटी ते परत येतील आणि दुष्टतेपासून आपली संपूर्ण सुटका करतील. येशू ख्रिस्ताचे, अधर्मी लोकांसाठी वधस्तंभावरील मरण, हा त्याचा पाया होय. याशिवाय कोणतीच मुक्ति नाही.

१:५ **''स्तुति''**

१:६ **''वळून''**-ते सर्व परमेश्वराच्या सत्यतेपासून वळले होते. (ज्यांना त्यांनी बोलावले होते) कारण दुष्ट लोकांनी त्यांना धोका दिला होता; परंतु ते पूर्व रितीने बदलले नव्हते.

**''तुम्हास बोलावले-पाचारण केले''** रोम १:६; ८:३० वरील नोट्स पहा.

**''वेगळया प्रकारची विचार प्रणाली''**-यहूदी शास्त्राचे पालन केल्याने मुक्ति मिळेल, अशी त्यावेळची शिकवण होती. ३:१-५; ४:९:११,२१; ५:२-४; प्रेषित १५:१५ पहा) मुक्ति हे विश्वासाने प्राप्त होणारे व फुकट मिळणारे बक्षिस आहे, हा ख्रिस्ताचा संदेश पौलाने दिला. (२:१६;३:६-९,२६; ५:५,६ तुलना करा रोम ४:५; ६:२३; इफि २:८,९). खोटया शिक्षकांनी खोटा संदेश दिला की ख्रिस्तावर विश्वास ठेवणे पुरेसे नाही; त्यांनी मोशेच्या शास्त्रातील लिहीलेल्या गोष्टींवर देखील विश्वास ठेवावा. इतकेच नव्हे तर मुक्तिसाठी त्यांना स्वत:लाहि काही करावे लागेल. या चुकीच्या शिकवणुकीचा गलतीयातील बरेच ख्रिस्ती लोक स्विकार करत होते.

१:७ **''सुवार्ता''**-याचा अर्थ उत्तम संदेश होय. जी शिकवण असे सांगते की, ख्रिस्ती लोकांनी यहूदी नियम शास्त्राचे (व्यवस्थेचे) पालन करावे ती सुवार्ता नव्हे. (३:१०; प्रेषित १५:१०) आज देखील जगात अनेक शुभसंदेश आहेत; परंतु जी सुवार्ता येशू द्वारे मिळणाऱ्या मुक्तिवर भर देत नाही किंवा अशी शिकवण जी एखादया धार्मिक प्रथेवर, चांगल्या कामावर किंवा स्वप्रयत्नांनी मिळणारी असून येशूच्या मुक्तिशी सांगड घालण्याचा प्रयत्न करते ती देखील ''सुवार्ता'' किंवा ''आनंदाचा संदेश'' होऊच शकत नाही.

**''काही लोक तुम्हाला त्रास देत आहेत''**- ४:१७; ५:१०,१२; ६:१२,१३.

**''भ्रष्ट''** फार कमी लोक असे आहेत की जे येशुच्या शुभसंदेशास न बदलता स्विकार करतात.

१:८ **''शापभ्रष्ट असो''**-तो सुवार्ता देण्याच्या गोष्टीवर भर देतो, त्यात बदल करणाऱ्या लोकांच्या भयानक अपराधाकडेहि इशारा करतो. पौलाला खात्री होती की स्वत: येशूंनी त्याला मुक्तिचा संदेशा दिला होता आणि (वचन ११,१२) हा संदेश मुक्ति देण्यासाठी सृष्टिकर्त्याचे सामर्थ्य आहे. (रोम १:१६) जो कोणी याला बदलण्याच्या प्रयत्नात आहे तो मुद्दाम किंवा अजाणपणाने एखादया व्यक्तिच्या मुक्तिचा मार्ग हिरावून घेत आहे. पहा मत्त २३:१३;लूक ११:५२. स्वर्गिय बाप आणि मानवते विरूद्ध हा एक अपराध आहे. जे लोक या अपराधाचे दोषी आहेत, जर त्यांनी आपली चूक मान्य करून सोडली नाही तर त्यांना शिक्षा होईल.

९ देवदूताने या सुवार्तेस सोडून इतर संदेश सांगितला, तर तो शापभ्रष्ट होवो. **जसे** मी पूर्वी सांगितले, पुन्हा सांगतो,
मी सांगितलेल्या शुभवर्तमाना व्यतिरिक्त कोणी जर इतर संदेश सांगितला तर तो शापित असो. मला मनुष्यांची
१० प्रशंसा हवी का? किंवा जगाच्या स्वामींची हवी? **मी** मनुष्यांना प्रसन्न करण्याची चेष्टा करतोय का? कारण जर
अजूनहि मनुष्यांना प्रसन्न करण्याचा प्रयत्न करतोय तर मी ख्रिस्ताचा दास होऊच शकत नाही.
११,१२ **परंतु** बंधू-भगिनींनो, मी तुम्हाला जी सुर्वाता सांगितली, ती मनुष्याची नाही. **कारण** मी ती मनुष्याद्वारे प्राप्त केली नाही
१३ किंवा कोणी मला ती शिकवली नाही; परंतु मी ही सुवार्ता येशू ख्रिस्तांपासून शिकलो आहे. **या साठी** की यहूदी पंथातील
माझ्या आचारां-विचारां विषयी तुम्ही ऐकले आहे की किती मोठया प्रमाणावर मी यहोवांच्या मंडळींचा छळ केला,
१४ त्यांना नष्ट करण्याचा प्रयत्न केला. **माझ्या** देशात पुष्कळशा लोकांच्या तुलनेत यहूदी मताच्या लोकांपेक्षा, मी पुढे गेलो
१५ होतो. आपल्या पूर्वजांच्या परंपरेपेक्षा अधिक उत्साह त्यांचा तुलनेने माझ्यात होता. **परंतु** ज्या यहोवा परमेश्वराने मला
१६ आपल्या इच्छेनुसार मातेच्या गर्भातूनच पाचारण केले होते **ज्याद्वारे** स्वत:च्या पुत्राला माझ्यावर प्रगट करावे या साठी
की मी यहूदी नसलेल्यांनाहि सुवार्ता सांगावी. त्यावेळी मी पूर्वी नियुक्त केलेल्या प्रेषितांचा सल्ला देखील घेतला नाही;
१७,१८ **परंतु** सरळ अरबस्तानात निघून गेलो आणि नंतर दिमीष्कास; पुन्हा परत आलो. **तीन** वर्षांनंतर मी पेत्राला
१९ भेटावयास यरूशलेमेस गेलो आणि पंधरा दिवस त्याच्या जवळ राहिलो. **तेथे** प्रभुचा भाऊ याकोब याला सोडून इतर
२०,२१ कुणाशी हि माझी भेट झाली नाही. **हे** सर्व खोटे नाही, मी परमेश्वराच्या उपस्थितित लिहीत आहे. **यानंतर** मी सूरिया
२२ व किलिकियाच्या क्षेत्रात आलो. **परंतु** ख्रिस्तात असणारच्या यहूदीयातील मंडळयांतून माझा चेहरा तो पर्यंत कोणीच

---

या गोष्टीवर भर देऊन तो पुन्हा सांगतो. स्वर्गिय बापाने दाखवलेल्या सत्याशी खेळ करण्याच्या दुष्टते विषयी आम्हाला शंका नसावी. तुलना करा प्रगटी २२:१८,१९. खोटया शिक्षकां विषयी इतर वचन:मत्तय ७:१५; २४:११; प्रेषित २०:२९,३०; रोम १६:१७,१८; २ करिंथ ११:१३-१५; १ तीमथ्य ४:१,२; २ तीमथ्य ४:३,४; २पेत्र २:१; यहूदा ४.

१:१० **"काय"**-पौलाच्या शत्रूंनी त्याच्यावर दोष लावला होता की जे लोकांना ऐकावेसे वाटते, तेच तो शिकवतो? वचन ६-९ यात दिसते की जे काही याच्या विपरित आहे, तेच सत्य आहे. जे यहोवा परमेश्वराने प्रगट केले होते, तेच पौल नेहमी शिकवत असे. कोणाला वाईट वाटेल, याचे त्याला भय नव्हते. (प्रेषित २०:२०,२६,२७) त्याच्या सुवार्तेत, येशूला सोडून इतर कोणाला ही तो प्रसन्न करू इच्छित नव्हता. लोकांना आवडो अथवा न आवडो सत्य संदेश देणे आवश्यक आहे. हे तो जाणत होता. पौलासारखी वागणूक नसली तर कोणीहि ख्रिस्तांचा खरा दास होऊ शकत नाही. लोकांना ख्रिस्ताद्वारे लोकांना प्रसन्न करण्यास तो तयार होतो. पहा रोम १५:१-३;११: करिंथ ९:१९-२३; १०:३३ या दोन्ही बाबतीत आपण पौलाला आपला आदर्श बनवू शकतो.

१:११ पहा २ पेत्र १:१६; इब्री २:३; प्रेषित १:१,३,८; २:३२; योहान ७:१६,१७; १२:४९,५०; लूक २४:४५-४८.

१:१२ इफि ३:२-५; रोम १६:२५-२७; १करिंथ १५:३; प्रेषित २२:१४,१५; २६:१५,१६ हे जास्त आवश्यक होय. जे खोटे शिक्षक गलतीया येथे गेले होते ते या गोष्टीस नकार देत होते म्हणून पौल या गोष्टीवर जास्त भर देत होता. त्याने समजण्यात चूक केली म्हणून किंवा माणसांकडून या गोष्टी मिळाल्या म्हणून तो लोकांना सांगत नव्हता. स्वत: येशूने त्यावर हे सत्य प्रगट केले होते म्हणून संपूर्ण अधिकाराने तो सांगू शकत होता. दूसऱ्या शुभसंदेशाशी तुलना करून, त्याने सांगितलेली सुवार्ता खरी आहे की खोटी, हे ठरवण्याकरता त्याला याची गरज नव्हती. परंतु आपण आपल्या शुभवर्तमानाची तुलना पौलाच्या सुवार्तेशी करावी. त्याच्सारखे जर आपण नाही तर हा खरा शुभसंदेश नाही. पहा २ करिंथ १:१२-१४.

१:१३-१४ प्रेषित ७:५८; ८:१-३; ९:१-२; फिलिप्पै ३:४-६; १ तीमथ्य १:१३.

१:१५ **"आईच्या गर्भातून"** -यिर्मया १:५ आणि योहान १५:१६ शी जुळवा.

**"आपली असीम दया-कृपा"** -वचन ६. जन्माच्या फार नंतर पौलाला यहोवा परमेश्वराचे पाचारण झाले होते यासाठी की ज्या कामासाठी त्याला जन्मापासून वेगळे केले गेले होते तो हेतू पूर्ण व्हावा.

१:१६ पौलाला ख्रिस्त प्रगट झाले होते.(प्रेषित ९:३,४; १करिंथ ९:१) येथे परमेश्वराने कशाप्रकारे त्याच्या ठायी येशू प्रगट करण्याचा विचार केला होता हे तो सांगतो. पौलाला कळले होते की ख्रिस्त त्याच्या ठायी वसतात, कार्य करतात या साठी की त्याने इतरांना ख्रिस्ता विषयी सांगावे (२:२०; २ करिंथ ४:१०:११; कलस्से १:२९. सर्व विश्वासणाऱ्यांसाठी परमेश्वराचा हाच उद्देश आहे.

"यहूदी नसलेले" २:७; प्रेषित २२:२२;२६:१६,१८; इफि ३:८. बायबल मध्ये "अन्य जाति" म्हणजे यहूदी नसलेले असा अर्थ होय.

१:१७ हे तेच स्थान होते जेथे तो अरबस्तानाच्या यात्रेविषयी उल्लेख करतो. प्रेषित ९:१९-२२ च्या सर्व घटनांच्या वेळीच ही घटना घडली असावी. पौल येथे जाण्याचा हेतू सांगत नाही. नक्कीच तो प्रार्थना, मनन व सहभागितेसाठी तेथे गेला असावा. त्याने मानवाचा सल्ला घेण्याऐवजी परमेश्वराचा सल्ला घेतला (वचन १६).

१:१८,१९ प्रेषित ९:२६-३०. कदाचित दूसरे प्रेषित त्या समयी यरूशलेमेत नव्हते. पेत्र व याकोबाने त्यांचे स्वागत केले, सोबतच इतर ते त्यांच्या बरोबर होते नक्कीच त्यांनी हि पौलाचे स्वागत केले असेल.

१:२० खऱ्या सुवार्तेचा स्विकार होणे धोक्यात असल्यामुळे पौल. मोठया गंभीरतेने ही गोष्ट सांगतो, जर त्यांनी विश्वास केला नसता तर जे ते करत होते तेच त्यांनी कायम ठेवले असते (वचन ६)

१:२१ प्रेषित ९:३०; ११:२५,२६. तासी किलिकियात (तुर्कस्तानचा एक भाग) होते. अंत्युखिया सिरियात होते.

१:२२ पौलाचे कार्य दुसऱ्या क्षेत्रात होते. फार कमी वेळ त्याने यरूशलेमेत खर्च केला. त्यामुळे यहूदाचे बहुतेक लोक त्याला ओळखत नव्हते.

२३ पाहिला नव्हता. **त्यांनी** केवळ ऐकले होते की, ''जो आपला छळ करत होता, तो स्वत: त्याच सुवार्तेची घोषणा करत
**२** आहे, जी तो नाश करण्याचा प्रयत्न करत होता. त्यांनी माझ्या पालटा विषयी देवबापाची स्तुति केली. **चौदा** वर्षांनी
२ मी बर्णबा व तीताला घेऊन पुन्हा यरूशलेमेस गेलो. **स्वर्गीय** मार्गदर्शन प्राप्त केल्यानंतर मी या साठी असे केले की
त्यांना ती सुवार्ता सांगावी जी मी परराष्ट्रीयांना सांगितली होती. असे मी आदरणीय लोकांबरोबर एकांती केले. यासाठी
३ की माझी धाव व्यर्थ जाऊ नये. **तथापि** तीत तो ग्रीक होता, माझ्यासोबत होता, त्याला सुंता करण्यास भाग पाडले गेले
४ नाही हे त्या खोटया बंधु मुळे झाले ज्यांना गुप्तपणे नेले गेले होते. **ते** आम्हाला ख्रिस्त येशूतील आमच्या स्वतंत्रेपासून
५,६ दूर नेण्यासाठी लपून हेरगिरी करत आहेत. **आम्ही** एक क्षण देखील स्वत:ला त्यांच्या हाती सोपवले नाही. **यासाठी** की
७ सुवार्तेची सत्यता तुम्हासोबत कायम राहावी.**या** उलट त्यांनी पाहिले की सुंता न झालेल्या लोकां पर्यंत सुवार्ता नेण्याची
८ जबाबदारी माझ्याकडे आहे.ज्याप्रकारे झालेल्यांची जबाबदारी पेत्राकडे दिली गेली होत. **जो** पवित्र आत्मा पेत्राला
प्रेषितपणा चालवण्यास शक्ति पुरवीत होता तोच यहूदी नसलेल्यांमध्ये सुवार्तेचे कार्य प्रभावशाली रितीने करण्यास माझ्यात
९ कार्य करत होता. **याकोब**, केफा व योहान जे आधारस्तंभ मानले जात होते, आणि जेव्हा त्यांनी माझ्यावरील स्वर्गीय
दया पाहिली, तेव्हा बर्णबा आणि मला सहभागितेचा उजवा हात दिला. त्यांनी आमचा सल्ला मान्य केला ज्याद्वारे आम्ही
१० परराष्ट्रीयांकडे व ते यहूदी लोकांकडे जातील; **पण** त्यांची इच्छा होती की आम्ही गरिबांची आठवण ठेवावी. मी

---

१:२३-२४ पौलाच्या बदला विषय त्यांना माहित होते, परंतु या साठी ते पौलाची स्तुति करत नव्हते. जया परमेश्वराने पौलाचा पालट केला होता, त्याचीच स्तुति ते करत होते. पौलाची इच्छा देखील हिच होती. (१ करिंथ ३:४-७; इफि १:६,१२,१४; फिली १:११)

२:१-१० पहिल्या अध्यायातील विषयाला तो चालू ठेवतो. तेथे तो म्हणतो की स्वर्गिय पित्याने त्याला प्रेषित होण्याकरता बोलावले आणि त्याला सुवार्ता सांगितली. येथे तो सांगतो की दूसऱ्या प्रेषितांनी देखील त्याला प्रेषित म्हणून मान्य केले आणि ओळखले. यासाठी की जो त्यांचा संदेश होता तोच पौलाचाहि होता.

२:१ **''बर्णबा''** -प्रेषित ४:३६; ९:२७; ११:२५,३०; १२:२५;१३:२; १५:२.

''तीत'' - २ करिंथ २:१३;७:६; २ तीमथ्य ४:१०; तीताला १:४.

२:२ **''स्वर्गिय मार्गदर्शन''** - परमेश्वराने दिलेले ज्ञान.

**''एकांतात''**-सुवार्तेच्या बाबतीत यरूशलेमेच्या मंडळीतील कोणत्याहि वादात पाडण्याची त्याची इच्छा नव्हती. एकांतात मिळालेल्या सुवार्तेबद्दल ते सहमत होतील अशी त्याने आशा केली होती. त्यानंतर मात्र लोकांसमोर ही सुर्वाता प्रस्तुत केली जाणार होती.

''यासाठी की माझी धाव व्यर्थ होऊ नये'' - पौलाला यात शंकाच नव्हती की त्याजवळची सुवार्ता खरी आहेच की नाही. त्याला ठामपणे माहित होते की जे त्याच्याजवळ आहे तेच सत्य आहे. (१:१२) दुसऱ्या प्रेषितांनी जर त्याच्या सुवार्तेच्या विरोध केला तर यहूदी नसलेल्यांमध्ये त्याचे जे कार्य चालू होते ते नष्ट होईल, अशी पौलाला भीति वाटत होती.

२:३ त्या दिवसात ''सुंना'' हा चर्चेचा विषय असायचा. वचन १२;५:२,३,६,११;६:१२-१५; प्रेषित १५:१-५; रोम ४:९-१६. प्रश्न हा होता की यहूदी नसलेल्या ख्रिस्ती लोकांनी यहूदी धर्माचा स्विकार करून, सुंना करून, मोशेच्या नियम शास्त्राचे पालन करायचे आहे काय ? पौल व इतर प्रेषितांचे उत्तर होते ''नाही''. तीताची या बाबतीत चांचणी घेण्यात आली. तो यहूदी नव्हता. त्याची सुंता झाली नसतानाहि, यरूशलेमेत प्रेषितांना त्याला ''खरा विश्वासू'' या नात्याने ग्रहण केले होते.

२:४ **''खोटे बंधू''**-हे यहूदी होते. त्यांना यरूशलेमेच्या विश्वासूंनी आपल्यामध्ये स्विकार केले होते. या यहूदयांचे लक्ष्य होते की येशूच्या सर्व विश्वासूंना (मग ते यहूदी असोत की नसोत) मोशेच्या नियमशास्त्रातील रिती-विधीत आणावे. मुख्य प्रश्न होता की, लोकांनी मुक्ति कशी प्राप्त करावी नियमशास्त्राचे पालन करून किंवा यहोवा परमेश्वराच्या असीम कृपेने ? उत्तर स्पष्ट आहे- ५:१-४; प्रेषित १३:३८,३९; १५:१०,११; रोम ३:२४-२८; ६:१४;७:४.

एक क्षण देखील खोटया शिकवणीचा अवलंब केला तर गलतीयांच्या मंडळीची मोठी हानि होईल याची कल्पना पौलाला होती. काहीही करताना त्याचा दूसऱ्यांवर काय परिणाम होईल या कडे त्याचे लक्ष होते.

२:६-९ पौल लोकांना प्रतिष्ठा देण्याच्या पक्षात नव्हता, मग तो स्वत: असो किंवा कोणी दूसरा -१ करिंथ ३:५,२२,२३; ''लोक कसे आहेत, त्यांच्या जवळ किती मोठी संधि आहे, ते किसी उच्च पदावर आहेत, दूसऱ्यांच्या दृष्टित त्यांच्या किती आदर आहे'', या सर्व गोष्टी त्याच्या करता विशेष महत्वाच्या नव्हत्या. त्याच्यासाठी मुख्य मुद्दा हाच होता की जे वचन त्यांना दिले गेले आहे, ते जसेच्या तसेच त्याचा स्विकार करतील किंवा नाही. गलतीयाच्या मंडळयांना पौलाने हा संदेश दिला की पेत्र, याकोब व योहान जे यरूशलेमेच्या मंडळीचे पुढारी होते, सुवार्तेच्या खऱ्या अर्थाच्या दृष्टिकोनातून त्याच्याशी सहमत होते. (वचन ९)

७,८,९ वचन सुंता न केलेले, यहूदी नसलेले व सुंता केलेले, यहूदी यांच्याकडे इशारा करतात. त्या दिवसात लोकाद्वारे याच प्रकारच्या भाषेचा वापर केला जात असे.

२:१० दूसऱ्या प्रेषितांना वाटत होते की, परराष्ट्रीयांमध्ये सुवार्ता गाजवत असतांना पौलाने यहूदीयातील यहूदी ख्रिसती लोकांच्या शारीरिक गरजा विसरू नये. पौल स्वत: तेथील गरीब लोकांना मदत करण्यात रूचि घेत होता. प्रेषित २४:१७; रोम १५:२५-२८; १ करिंथ १६:१-४; २ करिंथ ८,९. एका महत्वपूर्ण मुद्दयामध्ये गरिबांच्या मदतीचा विषय हेच दर्शवितो की हे सेवा किती महत्वाची होती. पहा निर्गम २३:११; अनुवाद १५:७,८, स्त्रोत ४१:१; नीति १४:३१; १९:१७; २१:१३; २९:७; ३१:९; मत्तय १९:२१; २ करिंथ ९:९.

११ पूर्णपणे यासाठी त्यार होतो. **जेव्हा** पेत्र अंत्युखियास आला, मी त्याचा विरोध केला कारण तो दोषी होता. **परंतु**
१२ याकोबाकडे काही लोक आल्यावर पहिले तो परराष्ट्रीयांसोबत भोजन करत असे, पण तेथे पोहोचल्यानंतर सुंतावाल्यांच्या
१३ भितीने त्याने स्वत:ला वेगळे केले होते. **इतर** यहूदी त्यासोबत ढोंगी झाले येथ पर्यंत की बर्णबा सुद्धा त्यांच्या ढोंगात
१४ सामिल झाला. **जेव्हा** माझ्या दृष्टिस आले की त्यांची वागणूक शुभवर्तमानाच्या सत्यतेच्या अनुकूल नाही तेव्हा मी
सर्वांसमोर पेत्रास म्हटले, "यहूदी असतानांही जर तुम्ही यहूदी नसल्या सारखे जीवन जगता तर परराष्ट्रीयांना यहूदी
१५,१६ लोकांसारखे जीवन जगण्यास का भाग पाडता ? **आम्ही** जन्मत: यहूदी आहोत, आणि परराष्ट्रीयांतले नाही, **तरी** मनुष्य
१७ नियमशास्त्रानुसार काम करण्याने नव्हे तर "फक्त येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवल्यामुळे निर्दोष ठरतो." **आम्ही** देखील
येशू वर विश्वास ठेवला यांसाठी की त्याद्वारे आम्ही निर्दोष ठरविले जावे, नियमशास्त्रानुसार नव्हें कारण नियमशास्त्रानुसार
वागणारा कोणीही नितीमान ठरविला जाणार नाही. आम्ही जे येशूत निर्दोष ठरविले जाणार, जर स्वत: गुन्हेगार
१८ निघालो तर, ख्रिस्ताने आम्हाला अपराध करण्यासाठी वर उचलले काय? मुळीच नाही **कारण** जे काही मी पाडून
१९ टाकले ते पुन्हा उभारीत असलो तर मी स्वत: कायदा मोडणार झालो. **कारण** मी नियमशास्त्राद्वारे मेलो यासाठी की

---

२:११:२१या भागात पौल आपल्या प्रेषित पदाविषयी म्हणतो. त्याला माहित होते की ख्रिस्ताने त्यापर्यंत ही सुवार्ता पोचवली होती. म्हणून ते उघड-उघड त्या लोकांविरूद्ध बोलण्यास तयार असे जेणेकरून विवादाच्या मुद्दयावर प्रकाश टाकता यावा.सुरवातीच्या प्रेषितांमध्ये ये पेत्र हा पुढारी होता.त्याच्यात हि उणिवा होत्या. एक वेळ अशी आली की शुभवर्तमानाखातर पौल पेत्रावर रागावला.

२:११ हे ठाऊक नाही की पेत्र अंत्युखियेत केव्हा व का आला. त्यावेळी अंत्युखिया, अशियातील सर्वात मोठे शहर होते, आणि परराष्ट्रीयांचे केंद्र (प्रेषित ११:१९-२६; १३ :१-३)

२:१२ **"याकोबा जवळ"**-याचा अर्थ हा नव्हें की याकोबाने या लोकांना पाठवले होते. याचा अर्थ असा होऊ शकतो की तो यरूशलेमेतून तेथे गेला जेथे याकोब एक पुढारी होता. प्रेषित १५:१३,२०,२४ शी जुळवा. पेत्र व योहाना सोबत याकोबाने पौलापुढे मित्रतेचा हात केला, हे दाखवावयास की पौलाद्वारे दिल्या जाणाऱ्या सुवार्तेशी ते देखील सहमत आहेत. (वचन ९) अंत्युखियात येणाऱ्या लोकांना पौल सुंता झालेले "असे म्हणतो. ते यहूदी मतातील ख्रिस्ती असून अशी शिकवण देत होते की ज्या यहूदींनी ख्रिस्ताचा स्विकार केला आहे. त्यांनी यहूदी नियमांचे व विधिंचे पालन करतच रहावे. त्यांचे मत असे होते की जो पर्यंत परराष्ट्रीयांतील ख्रिस्ती लोक यहूदी प्रथांचे पालन करत नाही. तो पर्यंत त्यांच्या सोबत भोजन देखील करू नये. पेत्राला कळले होते की त्याने चुकीचा व्यवहार केला होता. (१०:२७-२९; ११:२-१७) म्हणून त्याने अंत्युखियात यहूदी नसलेल्या विश्वासू सोबत भोजन केले. पण जेव्हा सुंता केलेला समूह तेथे आला तेव्हा तो त्यांच्यापासून वेगळा झाला.

२:१३ **"ढोंग केले"**-हे शब्द पौलाने पेत्राच्या व्यवहारा करता काढलेत. यासाठी की पेत्र स्विकार करत होता (की यहूदी नसलेल्यां ख्रिस्ती लोकां बरोबर भोजन करणे बरोबर आहे.) परंतु त्याचा व्यवहार त्याच्या विश्वासाच्या उलट होता.

२:१४ पौलाने हेरले होते की स्थिती गंभीर होती. पेत्र सत्य जाणताना देखील त्याप्रमाणे वागत नव्हता. त्याचे कार्य, खऱ्या सुर्वाविषयी प्रश्नचिन्ह लावत होते. असेच इतरांच्या शब्दांनी देखील झाले होते. (प्रेषित १५:१-५).

**"यहूदी नसल्यांसारखे जगता"**-पौलाचा अर्थ होता की पेत्र स्वत: यहूदी रिती -विधींचे व नियमांचे पालन करत नव्हता.

**"भाग पाडता"**-पेत्र आपल्या शब्दाद्वारे नव्हे तर कार्याद्वारे यहूदी नसलेल्यांवर दाब घातल होता; म्हणून सत्यतेच्या दृष्टिकोनातून पौल पेत्रावर क्रोधित झाला. वचन १५-२१ यात तो शुभसंदेशाचा अर्थ सांगतो. या पत्रात जे काही लिहिलेले आहे ते वचनात लिहिलेल्या सत्याच्या पायावर आहे.

२:१५ पौल यहूदी होता, त्याच दृष्टिकोनातून तो बोलतो.

२:१६ तो म्हणतो की यहूदी ख्रिस्ती पुढाऱ्यांनी एक सरळ साधी-सत्य गोष्ट शिकून घेतली होती -मोशेच्या नियमाशास्त्राचे पालन केल्याने मुक्ति प्राप्त होत नाही. प्रत्येकजण मग तो यहूदी असो किंवा नसो, येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवल्यामुळे नितीमान् ठरतो. (प्रेषित १३:३८,३९); रोम ३:२४-२६,२८,३०; ५:१) असा कोणताहि प्रयत्न जो यहूदी धार्मिक गोष्टींचे पालन आवश्यक आहे यांवर भर देतो, तो सुवार्तेच्या सासारांशावर एक आक्रमण होय. आज देखील अशीच स्थिति आहे. कोणत्याहि धार्मिक नियमांच्या पालनाने मुक्ति मिळेल किंवा मुक्ति प्राप्त करण्यास मदत होईल, अशी शिकवण सरासर खोटी होय. जी शिकवण सांगते की स्वमेहनतीने, सत्कर्माने, मानवी योग्यतेने, तारण प्राप्त होते ती चुकीची आहे.

२:१७ ज्या लोकांना सत्येती विषयी पूर्ण समज नाही, अशांना पौल सुवार्ते विरूद्ध संभाव्य तक्रारी करता उत्तर देतो. येथे भाषा फार विचित्र आहे. परंतु शक्य आहे की ही तक्रार तशीच आहे जी रोम ६:१,१५ यात आहे. येशू वर विश्वास ठेवणे म्हणजे दुष्टतेला वाव देणे असा याचा अर्थ आहे काय ? उत्तर आहे "मुळीच नाही" (रोम ३:३० यावरील नोट्स पत्र रोम अध्याय ६ आणि नोट्स पहा).

२:१८ याचा अर्थ असा : परमेश्वराने मोशेच्या नियमशास्त्रा द्वारे मुक्ति दिली या गोष्टीस नकार दिल्यावर जर मी (किंवा इतर कोणी) त्याच नियमशास्त्राला मुक्तिचा मार्ग मानला, तर मी या पापाचा दोषी आणि नियमशास्त्राचाहि अपराधी ठरतो." इब्री २:१-४; ६:४-६; १०:२६-२९; १२:२५.

२:१९ **"मेलो"** - रोम ७:१-४ नियमशास्त्राला मुक्तिचा आधार बनवले तर दुष्टतेला वाव मिळत नाही. विश्वासूला या कारणाने हिंमत मिळते. "परमेश्वर यहोवा करता जगावे." नियमशास्त्र जीवन देण्याऐवजी मृत्यूचे हत्यार बनला (रोम ७:९-११; २करिंथ ३:६).

२० यहोवा परमेश्वरासाठी जगावे. **मी** येशू बरोबर वधस्तंभवर चढलो आहे आणि आता मी नव्हे परंतु ख्रिस्त माझ्यात
जिवंत आहे. म्हणून या शरीरातले माझे जीवन, परमेश्वराचा पुत्र येशू, यांच्या विश्वासयोग्यतेमुळे आहे, ज्यांनी मजवर
२१ प्रेम केले आणि स्वत:ला माझ्यासाठी देऊन टाकले. **मी** परमेश्वराच्या असीमित कृपेकडे दुर्लक्ष करत नाही, कारण
**३** नियमाशास्त्राद्वारे निर्दोष ठरवता आले असते तर येशूचे मरणे व्यर्थ झाले असते. **हे** मूर्ख गलतीकरांनो, तुम्हाला कोणी
भुरळ घातली की सत्यापासून अजाण राहावे. येशू अगदी तुमच्या डोळयासमोर जणू वधस्तंभावर खिळलेले दाखवले गेले
२ होते. **मी** तुम्हाला एक गोष्ट विचारतो:पवित्रआत्मा नियमाशास्त्राच्या पालनाद्वारे तुम्ही प्राप्त केला होता, की विश्वासाने
३ ऐकण्या द्वारे? तुम्ही इतके बुद्धि हिन आहात काय? **पवित्र आंत्म्याच्या** मदतीने सुखात करून स्वत:च्या इच्छेप्रमाणे
४ केल्याने तुम्ही सिद्ध व्हाल काय? **तुम्ही** इतकी दु:खे सोसली ते व्यर्थ जाणार काय? जर होय तर सर्व व्यर्थ जाणर
५ काय ? जर होय तर सर्व व्यर्थ झाले. **जे** तुम्हाला पवित्र आत्मा देतात, तुमच्यात अद्भुत कार्य करता, ते नियम
६ शास्त्राच्या आधारे आहे. किंवा तुम्ही विश्वासाने ऐकले त्यामुळे आहे?**जसा** अब्राहामाने भंरवसा केला आणि ती त्याच्यासाठी
७,८ नितिमत्ता गणली गेली. **म्हणून** हे जाणून घ्या की जे विश्वास करतात तेच अब्राहामाची मुले-मुली आहेत. **ही** गोष्ट
लक्षात ठेवूनच की विश्वासाद्वारे परराष्ट्रीय नितीमान् ठरवले जातील, शुभवर्तमानाने पूर्वीच ही घोषणा केली होती की
९ "सर्व राष्ट्रांना तुझ्याकडून आशीर्वाद मिळेल".**म्हणून** ज्यांच्या जवळ विश्वास आहे, ते विश्वासणाऱ्या अब्राहामासोबत

---

२:२० **"ख्रिस्ताबरोबर क्रूसावर चढलो"**-केवळ पौलासाठीच नव्हे तर प्रत्येका करता हे खरे आहे. रोम ६:३-८ पहा. येशू त्यांच्या जागी मरण पावले. येशूच्या मरणास परमेश्वर विश्वसूंचे मरण समजतात. एका नवीन प्रकारच्या जीवनासाठी हाच एकमेव मार्ग आहे. आत्मिक जीवनासाठी विश्वासू हा मार्ग नव्हे. ख्रिस्तच त्याचा स्त्रोत आहेत. हे जीवन जगण्यासाठी विश्वासूच्या शरीर व बुद्धितून नवजीवन प्राप्त होत नाही तर त्यांच्या आत वसणाऱ्या येशूंद्वारे. रोम ८:१-१० शी तुलना करा. नविन जीवन परमेश्वर-पुत्राच्या विश्वासाद्वारे जगता येते.खरे ख्रिस्ती जीवन येशू वर भरंवसा ठेवल्यामुळे सुरू होते आणि याच प्रकारे चालू राहाते. (२ करिंथ ५:७; कलस्सै २:६-७). पौल दूसऱ्यांना जे काही करायला लावतो, तो स्वत: देखील करतो. रोम ६:११.

२:२१ **"स्वत:ला माझ्यासाठी दिले"**-१:४; रोम ५:६-८; १२:२१ नियमाशास्त्रानुसार (यहूदी धर्म व्यवस्था) केल्याने मृत्युला तारण प्राप्त करतो ही शिकवण, ख्रिस्ताच्या मृत्यूला बेकायदेशीर आणि निष्कामी ठरवते. म्हणून याला रद्द करणे पौलासाठी काही कठीण कार्य नाही. जर लोक स्वत:च्या कर्माद्वारे स्वत:च्या संबंधात सुधारणा करू शकत होते तर ख्रिस्ताला मरण्याची काय गरज होती? हे स्पष्ट आहे-कृपेद्वारे मुक्ति किंवा कोणतीच मुक्ति नाही.

३:१ जर आपण विश्वास केला की येशूचे "मरण अर्थहिन आहे तर ती शुद्ध बुद्धिहिनता ठरेल. परंतु खोटे ख्रिस्ती या खिस्ती लोकांनी अशाच स्थितित ढकलण्याचा प्रयत्न करत होते. येशू असेच मेले असे ते बोलत नव्हते, परंतु येशूंचे बलिदान व त्यासोबत नियमशास्त्राच्या पालनाची गरज दाखवून, अप्रत्यक्ष रितीने शिकवत होते की येशूच्या मृत्यूची कोणतीच आवश्यकता नव्हती. पौलाने त्यांना वचन देताना या प्रकारे शिकवले नव्हते.

३:२ आपल्या अनुभवाला एक सिद्धता समजून तो म्हणतो, मी हे सत्य शिकवले होते. जेव्हा त्यांनी या सत्यावर भरंवसा केला तेव्हाच त्यांनी परमेश्वराचा आत्मा प्राप्त केला. (तुलना करा ४:६; इफिस १:१३; प्रेषित १०:४४; रोम ८:१५). नियमशास्त्रानुसार वागण्याच्या आधारे, त्यांच्या आत राहण्याकरता आत्मा दिला गेला नव्हता. विश्वासाने त्यांनी तो प्राप्त केला होता. आजपर्यंत कोणीहि रिती-विधि आणि प्रथांचे पालन करून परमेश्वराचा आत्मा प्राप्त केला नव्हता, लक्ष दया, लोकांजवळ परमेश्वराचा आत्मा असाच नसतो, तर येशूवरील विश्वासाने याला ग्रहणा केले जाते. योहान १४:१७ पहा.

३:३ परमेश्वराच्या कृपेद्वारे त्यांनी हा अनुभव घेतला होता कारण त्यांनी येशूवर विश्वास केला होता. असा विचार करणे बुद्धिहिनता नव्हे का, की आमचे प्रयत्न, नियम, नियमशास्त्रातील रितीविधि आम्हाला पुढे नेऊ शकतात ? किंवा त्यांना देखील पुढे नेतील.

३:४ त्यांच्याबद्दल त्याला शंका आहे. खोटे शिक्षक आपल्या प्रयत्नात यशस्वी होतील काय? तेथील ख्रिस्ती अशा प्रकारच्या बिघडलेल्या संदेशास ग्रहण करतील काय ? येशूसाठी त्यांनी त्रास भोगल्यामुळे, जे पुरस्कार त्यांना मिळणार होते, ते चुकवणार काय ? त्यांच्या वागणुकीवर त्याला आश्चर्य व शंका वाटते (४:११,२०).

३:५ वचन २ च्या प्रश्नाला वेगळया स्वरूपात विचारतो. खोटी शिकवण नकारण्याकरता जे काही त्यांनी ऐकले होते, त्याबद्दल त्यांनी विचार करावा आणि सत्य - ज्ञानाचा उपयोग करावा अशी पौलाची इच्छा होती.

३:६ **"अब्राहम"** पौलाचा उद्देश्य हेच सांगणे आहे की नियमशास्त्राच्या विश्वासाचा आधार न घेता, यहोवा परमेश्वर निर्दोष ठरवतात.
**"धार्मिकता-नितीमत्ता"**- उत्पत्ति १५:६; रोम ४:३.

३:७ रोम ४:११,१२,१६,१७ येथे "मुले-मुली" चा अर्थ आहे, आत्मिक वारीस.

३:८ उत्पत्ति १२:३; १८:१८; २२:१८.
**"शुभसंदेश"** - रोम ३:१०; ४:३.
**"तुझ्याद्वारे आशीर्वाद"** पहा उत्पत्ति १२:३; १८:१८. २२:१८.

३:९ आज सगळीकडे असा समज आहे ही धार्मिक रितीविधि प्रमाणे केल्यावर परमेश्वराचा आशीर्वाद प्राप्त होतो. त्यांना वाटते की परमेश्वराने मोशेला जे नियम दिले होते त्यांचे पालन केल्याने परमेश्वराचा आशीर्वाद प्राप्त केला जाऊ शकतो. पौल दाखवतो की स्वत:च्या प्रयत्नांनी नाही तर आशीर्वाद, भरवंसा ठेवल्यामुळे मिळतो. आशीर्वादावर नोट्स पहा. उत्पत्ति १२:१-३; गणना ६:२३-२७; अनुवाद २८:१-१४; स्तोत्र १:१; ११९:१; मत्तय ५:३-१२; प्रेषित ३:२६; इफि १:३.

१०,११ आशीर्वादित आहेत. **या** करता नियमशास्त्रातील कामांवर जे टिकून राहतात ते शापित आहते. **कारण** लिहलेले आहे
१२ की "प्रत्येकजण जो नियमशास्त्राच्या प्रत्येक गोष्टीवर टिकून राहत नाही तो शापित आहे."**परंतु** हे स्पष्ट आहे की
नियमांचे पालन केल्याने यहोवाच्या दृष्टित कोणीहि नितीमान ठरत नाही, यासाठी की नितीमान् ठरवलेला प्रत्येकजण
विश्वासाने जिवंत राहील नियमशास्त्र विश्वासापासून नाहीं परंतु "जो व्यक्ति त्यांचे पालन करतो, त्यांच्या द्वारे जगेल''.
१३ **ख्रिस्ताने** आम्हाला नियमशास्त्राच्या शापापासून स्वतंत्र केले (यासाठी की लिहिले आहे "की प्रत्येक व्यक्ति जो क्रूसावर
१४ चढतो, शापित आहे'') **यासाठी** की अब्राहामाला मिळालेला आशीर्वाद परराष्ट्रीयांना मिळावा ज्याद्वारे विश्वासाने
१५ **बंधू:भगिनींनो,** मी लोकांच्या जीवनशैली विषयी बोलतो: एकदा मनुष्याद्वारे जेव्हा, कायम केलेल्या कराराची पुष्टि होते,
१६ तेव्हा त्याला कोणी खारीज करू शकत नाही. किंवा त्यात जास्तीचे काहीही घालु शकत नाही. **अब्राहाम** व त्याच्या वंशाशी
१७ प्रतिज्ञा केली गेली होती. येथे "वंशांशी लिहिलेले नाही, परंतु वंशाशी'' ज्याचा अर्थ -एक व्यक्ति, जो ख्रिस्त आहे. **मी**
असे म्हणतो की जो नियमशास्त्र ४३० वर्षानंतर दिलेले ते ख्रिस्ताच्या आधी संपुष्टकेले गेले, यासाठी की प्रतिज्ञा खरी
१८ ठरावी. **म्हणून** जर नियम शास्त्राद्वारे वतन मिळले तर ते या प्रतिज्ञावर आधारित नाही. परंतु परमेश्वराने

---

३:१० अनुवाद २७:२६ पहा. परमेश्वरीय नियमशास्त्र पूर्ण केलयावर लोक, आशा असलेले आशीर्वाद प्राप्त करत नाही. याच्या विपरित घडते. ते दोषी ठरविले जातात. असे कसे होऊ शकते ? असे यासाठी होते, कारण नियमशास्त्र व्यक्तिकडूंन पूर्ण-पूर्ण पालनाची अपेक्षा करते, परंतु कोणीहि असे करूच शकत नाही. नोट्स पहा. निर्गम १९:५,६,८,२१-२५; फिलिपै ३:६ यात पौलाने म्हटले होते की "कायदयाची नितीमत्ता'' उणिव रहित आहेत. दहावी आज्ञा न पाळल्यामुळे आज्ञा भंग करणाऱ्यांना मिळणाऱ्या शापाचा प्रभाव त्याच्यावर देखील होता. (रोम ७:७-१४) जर एखादा कोणी परमेश्वराच्या एका नियमात चुकतो, तेव्हा तो पूर्ण नियम शास्त्राविषयी दोषी स्वर्गिय पित्याच्या नियमांच्या आधारे जगण्याचा प्रयत्न केला ते सर्व दंडास पात्र आहेत.

३:११ तीन ठिकाणापैकी हे पहिले स्थान होय जेथे हबक्कूक २:४ चा उल्लेख नवीन करारात केला गेला आहे. (रोम १:१७; इब्री १०:३८) नियमशास्त्रानुसार करण्याने नव्हे तर सृष्टिकर्त्यावर भरंवसा ठेवल्यामुळे मनुष्य निर्दोष ठरवला जातो.

३:१२ लेवीय १८:५ नियमशास्त्र आणि विश्वास हे दोन वेगवेगळे सिद्धांत आहेत. विश्वास परमेश्वरावर भरंवसा ठेवतो, मोबदल्यात मुक्ति व अनंत जीवन एका पुरस्काराच्या स्वरूपात प्राप्त करतो. नियमशास्त्र, सर्व नियमांचे पालन करणाऱ्यासच जीवनाची प्रतिज्ञा देतो. जो कोणी नियमांचे पालन करण्याचा केवळ प्रयत्न करतो त्याला जीवनाची प्रतिज्ञा नाही. नियमशास्त्र आपल्याबरोबर मृत्यू वर दंड आणतो (वचन १०; रोम ३:१९,२०).

३:१३ येशू दुष्टतेत पडणायांसाठी काय करू इच्छितात ते पहा. आमची जागा घेऊन त्यांनी तुटक्या नियमशास्त्राचा परिणाम (शाप) स्विकार केला. आमच्या अपराधांची शिक्षा त्यांनी ग्रहण केली. तुलना करा रोम ५:६-८; २ करिंथ ५:२१; १पेत्र ३:१८ "सोडविले'' यांवरचे नोट्स स्तोत्र ७८:३५ आणि मत्तय २०:२८ यात पहा.

"वधस्तंभ'' अनुवाद २१:२२,२३. जुण्याकाळी इस्त्राइली. अधिकारी अपराध्यांना लटकवत असत आणि झाडावर टांगून मारून टाकत. याप्रकारे लोकांसमोर त्यांना लज्जित केले जाई. येशूने आमचे अपराध घेऊन मृत्यू सहन केली आणि क्रूसावरचे लज्जास्पद मरण आमच्या करता सहन केले. पहा प्रेषित ५:३०; १०:३९; १३:२९; १ पेत्र२:२४. फाशीची शिक्षा आम्हाला मिळायला हवी होती.

३:१४ आपल्या दु:खात त्यांनी आमच्या आशीर्वादाचा विचार केला. आमच्या लाभाचा त्यांनी इतका अधिक विचार केला की दंड व क्रूसावरचे मरण देखील त्यांच्या करता काहीच नव्हते. येशूचे सर्व विश्वासू नियमाशास्त्राच्या शापापासून मुक्त केले गेले आहेत. (रोम ८:१) अब्राहमाला दिलेल्या प्रतिज्ञेनुसार ते सर्व वारीस बनतात. (पहा वचन ८,९).

**"पवित्र आत्म्याची प्रतिज्ञा''**-लूक २४:४९; योहान १४:१६,१७; प्रेषित १:४,५; २:३९ येथील शिकवण पहा. ज्या लोकांनी परमेश्वराच्या आत्म्यास प्राप्त केले त्या लोकांपर्यंतच यहोवा परमेश्वराचा आशीर्वाद असतो. विश्वासाने आम्ही तो आत्मा प्राप्त करतो. (वचन २:५; लूक ११:१३; इफिस १:१३). हे सर्व "येशू ख्रिस्ताकडून'' प्राप्त होते, इतर कोणाद्वारे नव्हे. या वचनावरून सिद्ध होते की येशूवंर विश्वास ठेवण्यापूर्वी आमच्या जवळ त्यांचा आत्मा नव्हता.

३:१५-१७ सामान्यत: हे लोकांमध्ये होणाऱ्या करारात होते. त्या गोष्टींसाठी ज्या होणार असतात. त्या तयार झाल्यानंतर त्यांना त्यापासून काही नुकसान होत नाही. पौल म्हणतो की अब्राहमाशी जो करार केला गेला होता त्यातहि असेच होते. वर्षांनंतर जेव्हा मोशेचे नियम शास्त्र दिले गेले, त्याचा यावर कोणताच प्रभाव पडला नाही.

३:१६ उत्पत्ति १२:७; १३:१५; २४:७. पौलाचा आशय आहे की जो करार परमेश्वराने अब्राहमाशी केला त्याचे वारीस येशू होते. ते अब्राहमाच्या वंशतले होते. (मतय १:१) जेव्हा येशूचे लोक येशूशी जुळलेले असतात तेव्हा ते अब्राहमाच्या आशीर्वादाचे भागीदार व सोबतच वारीस देखील आहेत. (वचन १४,२९; रोम ४:१३; ८:१७).

३:१८ ज्याप्रमाणे नियमशास्त्र व विश्वास हे दोन वेगळे सिद्धांत आहेत त्याचप्रमाणे नियमशास्त्र व अब्राहमाचा करार, अगदी भिन्न आहेत. अब्राहामाद्वारे लोकांना आशीर्वाद प्राप्त झाला, याचा नियमशास्त्राशी काहीच संबंध नव्हता. स्वर्गिय पित्याने प्रतिज्ञा केल्यावर लोकांनी त्यावर भरंवसा करून आनंदित व्हावे. त्यांना प्रतिज्ञा पूर्ण होण्याची प्रतिक्षा करत, नियम, रिती, विधि यांच्यावर विसंबून राहू नये.

**"वतनदारी (अधिकार)''** रोम ४:१३,१४; १ करिंथ ३:२२; इब्री ११:८-१०; १पेत्र १:४; मत्तय ५:५. येशूवर विश्वासणारे पृथ्वी आणि स्वर्गाचे अधिकारी होतील. जे काही ख्रिस्ताचे आहे, त्याचे ते भागीदार होतील (इब्री १:२).

"दिले'' (१:६) पौल कृपा, विश्वास व प्रतिज्ञा यांच्या विषयी सांगतो. त्याचप्रमाणे हे सर्व नियमाशास्त्राच्या विरूद्ध आहेत. या विषयी देखील स्पष्ट करतो.

१९ अब्राहामाला अभिवचनाद्वारे ते दिले आहे. **मग** नियमशास्त्राचा काय फायदा? ज्या वंशाशी प्रतिज्ञा केली गेली होती-तो
वंश जो पर्यंत आला नाही तो पर्यंत ती अपराधामुळे जोडली गेली होती. ती मध्यस्थ आणि देवदूतांद्वारे निर्धारित केलेली
२०,२१ होती. **मध्यस्थ** हा एक पक्षीय नसतो परंतु परमेश्वराकरता असेच आहे. **तर** मग नियमशास्त्र परमेश्वराच्या कराराच्या
विरोधात आहे काय ? असे होऊ नये? जर असे नियमशास्त्र दिले गेले जे जीवन देऊ शकते, तर खरोखर नितीमत्ता
२२ (निर्दोषपणा) नियमशास्त्रापासूनच प्राप्त झाली असती. **जे** पापांत आहेत त्या प्रत्येकाला वचनाने शापित केले यासाठी
२३ की येशू ख्रिस्तावर विश्वास केल्यामुळे जी प्रतिज्ञा फळरूपाने येते ती **विश्वासूंना** प्राप्त व्हावी. विश्वास येण्यापूर्वी आपण
नियमशास्त्राधीन केलो गेलो होतो, ज्याद्वारे प्रगट होणाऱ्या विश्वासाला प्रगट होई पर्यंत नियमशास्त्राच्या आधीनतेत
२४ राहावे. **या कारणाने** नियमशास्त्र आपल्याला येशूपर्यंत आणणार शिक्षक ठरला जेणेकरून आपण विश्वासाच्या
२५,२६ आधारे नितीमान ठरवले जावे; **परंतु** आता विश्वासाच्या आगमनाने आपण शिक्षकाच्या आधीन राहिलो नाही. **येशू**
२७ **वरील** विश्वासाने तुम्ही सर्व परमेश्वराची मुले-मुली आहात **तुम्हांपैकी** जितक्यांनी येशूचा बापतिस्मा घेतला त्यांनी
२८ येशूला पांघरले. **आता** कोणी यहूदी नाही किंवा परराष्ट्रीय गुलाम व स्वतंत्र यांत भेद नाही न कोणी नर न कोणी नारी
२९ आहे. येशू ख्रिस्तात तुम्ही सर्व समान आहात, **जर** वचनाप्रमाणे तुम्ही येशूचे आहात तर अब्राहमाचा वंश आणि वतनाचे
४ अधिकारी. **आता** मी असे म्हणतो, वारीस बाळ, ज्याचा सर्व वस्तूंवर अधिकार असतो, त्याच्यात व गुलामात काहीद भेद

---

३:१९ नियमशास्त्राचे पालन न केल्यामुळे, नियमशास्त्र मानणाऱ्या लोकांनाच त्याचे परिणाम भोगावे लागलेत. जेव्हा परमेश्वर लोकांना आशीर्वाद देऊ इच्छितो, तेव्हा त्यांनी नियमशास्त्र का दिले ? रोम ३:२०; ४:१५; ५:२०;७:७ पहा. परमेश्वराने नियमशास्त्राद्वारे अपराधास उघड करून त्याचे सामर्थ्य व स्वभाव दाखवला. यासाठी की लोकांच्या जीवनात येशूंची आवश्यकता प्रगट व्हावी. आपल्या जीवनात येशूंना ओळखणे व ग्रहण करणे हा सर्वोत्तम आशीर्वाद होय.

**"पर्यंत"** - परमेश्वराने जुण्या करारातील एक वेळ निश्चित केली होती. येशूचे आगमन व मुक्ति प्राप्त होईपर्यंतची ही वेळ होती.

**"देवदूतांनी"**-इब्री २:२; प्रेषित ७:३८,५३ पहा. मोशे तो मध्यस्थ होता ज्याच्याद्वारे नियमशास्त्र आले.

३:२०-२१ येथे पौल एका संभाव्य तक्रारीचे उत्तर देतो कारण परमेश्वर 'एक' आहे. (पुष्कळसे स्वत:ला ईश्वर म्हणतात पण त्यापैकी बहुतेक परमेश्वर नाहीत) पहिले अब्राहामाची प्रतिज्ञा व नंतर नियमशास्त्राचे येणे, जे प्रतिज्ञेच्या विरोधात होते तर असे का केले? पौल म्हणतो, समजण्यात काही तरी चूक झाली. नियमशास्त्र परमेश्वराच्या आशीर्वादाच्या विरूद्ध नाही. परंतु लोक जर नियमशास्त्रावर भरंवसा ठेवतच राहिलेत तर परमेश्वरीय प्रतिज्ञा कोणत्याच कामाची राहणार नाही. हे यासाठी की नियमशास्त्र आत्मिक जीवन देऊ शकत नाही किंवा निर्दोष देखील ठरवू शकत नाही. (रोम १४:८,३).

३:२२,२३ तुलना करा ३:१९-२४ नियमशास्त्र लोकांना दोषी करार देऊन त्यांच्या निवडक (दुष्टतेचा करावास) कारावासात त्यानां कैद करू शकतो. स्वप्रयत्नांनी, चांगल्या कामांनी व नियमशास्त्राच्या पालनाने, धार्मिक नियम व रिती-विधि पाळल्याने किंवा इतर कोणत्याच प्रकारे कोणीहि या तुरूंगापासून स्वत:ला वाचवू शकत नाही. मुक्ति, स्वतंत्रता, आत्मिक स्वतंत्रता आणि स्वर्गिय बापाचा आशीर्वाद, त्यांनी बनवलेल्या मार्गावर म्हणजेच-येशूवर, विश्वास आणल्यामुळे मिळू शकतो. (वचन ९,१४,२६;२:१६;रोम १:१६-१७;३:२२,२८; योहान ३:१६,३६; ५:२४; इफि २:८,९).

३:२४ नियमशास्त्र लोकांना अपराधांची क्षमा देऊ शकला नाही. येशूच्या मुक्तिचा मार्ग उघडेपर्यंत, परमेश्वराने यहूदियांना अनुशासित करण्यासाठी याचावापर केला. रोम ७:७-१४ यात पहा की नियमशास्त्र पौलाचा शिक्षक होता.

**"विश्वासाच्यां आधारवर नितीमान"**-२:१६.

३:२५ येशूने स्वत:च्या द्वारे विश्वासाचा मार्ग दाखवला. जेव्हा लोक मुक्तिसाठी येशूवर भरंवसा ठेवतात, तेवहा मोशेच्या नियमशास्त्राच्या त्यांच्यावर कोणताच अधिकार नाही. ६:१४.

३:२६ स्वभावाने लोक परमेश्वरांची मुले नाहीत. जरी परमेश्वराने सर्वांची रचना केली तरी, ते सर्वांचे आत्मिक बाप नाहीत (तुलना करा योहान ८:४४). येशूवर विश्वास ठेवल्यावरच लोक स्वर्गीय बापाची मुले बनतात. योहान १:१२,१३.

३:२७ **"ख्रिस्तात बापतिस्मा"** - रोम ६:३ चे नोट्स पहा. विश्वास लोकांना बापाची मुले बनवतो-(वचन २६) पाण्याचा बापतिस्मा नव्हे तर आंतरिक बदलाची, बाहेरून खूण. परमेश्वराचा आत्माच आम्हाला ख्रिस्ताशी जोडतो/बुडवितो. ख्रिस्ताला परिधान केले/पांघरले''- याचा अर्थ असा की स्वर्गिय बापा समोर, ख्रिस्तावर विश्वास ठेवणारे, ख्रिस्ताचा निर्दोषपणा पांघरून उभे आहेत. ज्याप्रमाणे येशू बापासमोर ग्रहणयोग्य आहेत तसेच त्यांचेही लोक आहेत.

३:२८ **"तुम्ही सर्व समान आहात"** - १ करिंथ १२:१३; योहान १७:२०-२३; कलस्सै ३:११. परमेश्वरासमोर येशू ख्रिस्ताच्या लोकांच्या विषयी कोणताच पक्षपात नाही. येशूच्या लोकासाठी, पृष्ठभूमि कूळ, सामाजिक स्थिति आणि जात इत्यादिंचे कोणतेच महत्व नाही. ज्या लोकांना नीच गरीब समजले जाते ते ख्रिस्तात इतरांसारखेच ग्रहणयोग्य आहेत.

३:२९ वचन ७,१४,१८.

४:१-७ त्या काळच्या काही विधिंची पौल आठवण करतो; आणि आत्मिक सत्यता शिकवण्याकरता त्यांचा उपयोग करतो. मुले वतनाचे भागीदार होते. त्यांचा उपयोग करतो. मुले वतनाचे भागीदार होते. आणि जे काही वडिलांचे होते ते मुलांचे होते. पण वडिल जर खर्च उचलू शकत होते तर तशा स्थितित मुलें मोठी होईपर्यंत मुलांची देखरेख करण्यासाठी एखादया व्यक्तिस जबाबदारी देत होते. एका निश्चित वयानंतर त्यांना "बाळ" नव्हे तर मोठे समजले जाई. पौल म्हणतो जे लोक नियमशास्त्राच्या अधीन होते, ते बालपणात (जेव्हा काहीच समजत नाही) होते, यामुळे स्वर्गिय पिता अजिबात आनंदित नव्हते. विश्वासूंना पुत्राचा हक्क मिळावा.

२,३ नसतो. बापाने ठरविलेल्या वेळेपर्यंत तो सांभाळणाऱ्यांच्या आणि प्रबंधकांच्या अधीन असतो. **तसे** आपण देखील बालपणी
४ जगातील प्राथमिक वस्तुच्या गुलामी होतो; **परंतु** जेव्हा काळाची पूर्णता झाली, सृष्टिच्या प्रभूने, स्त्रीद्वारे आपल्या पुत्राला
५ पाठविले, जो नियमशास्त्राच्या अधीन जन्मलेला होता. **यासाठी** की जे कोणी त्या नियमशास्त्राच्या अधीन होते त्यांना
६ अधिकार प्राप्त मुलां-मुलीं सारखे दत्तक घ्यावे. **म्हणून** तुम्ही जे बापाची मुले झालात, बापाने आमच्या आत आपल्या
७ पुत्राचा आत्मा पाठवला;जो ''बापा'' अशी हाक मारतो.**यासाठी** तुम्ही आता गुलाम नाही परंतु मुले-मुली आहात आणि
८ जर मुले-मुली तर ख्रिस्ताच्याद्वारे वाटीस देखील आहात **तथापि** पूर्वी तुम्ही बापाला ओळाखीत नव्हता, स्वभावाने त्यांचे
९ दास होता जे ईश्वर नव्हते; **आता** जेव्हा तुम्ही यहोवाला ओळखीले आहे किंवा त्यांनी तुम्हांला ओळखले, तर मग तुम्ही
१० दुर्बळ आणि सुरवातीच्या गोष्टींची इच्छाकरून पुन्हा गुलामीत का जाता? **तुम्ही** दिवस, महिने आणि वेगवेगळे सण
११,१२ पाळणारे आहात. **मला** भिती वाटते की कदाचित मी तुमच्या करता व्यर्थ परिश्रम केले. **बंधु:भगिनींनो,** मी तुम्हांला
१३ विनंती करतो की जसे मी तुमच्यासाठी झालो, तसे तुम्ही माझ्या साठी व्हा. **तुम्हाला** माहित आहे की शारीरिक दुर्बळते
१४ मुळे मी प्रथम तुम्हाला शुभसंदेश दिला होतो. **माझ्या** शरीरात जी अस्वस्थता मी सहन केली त्याला तुम्ही तुच्छ जाणले
नाही किंवा त्यावर व्यंग केला नाही; परंतु मला सृष्टिकर्त्याच्या देवूदताच्या रूपात स्विकारले येथ पर्यंत की तुम्ही मला
१५ ख्रिस्त समजलात.**ज्या** आशीर्वादांविषयी तुम्ही सांगितलेत, ते सर्व कोठे आहेत? मी तुमच्याबद्दल साक्ष दिली होती, ती

---

ख्रिस्ताच्या येण्यापूर्वी ते ''जगाच्या प्राथमिक सिद्धांताच्या (वचन ३) किंवा नियमशास्त्राच्या अधीन होते. (वचन ५). आता ते अशा ''पालकांच्या'' देखरेखीपासून मुक्त झाले आहेत. स्वर्गिय बापाची संतान होण्याच्या नात्याने त्यांना पूर्ण स्वतंत्रता व आशीर्वाद मिळालेले आहेत.

४:४ **''काळ-वेळ''**- येथो परमेश्वराचे पुत्र येशूच्या आगमनकडे इशारा केला आहे. ते एका स्त्रीद्वारे जन्मले (मत्तय १:१८-२१; लूक १:२६-३८) त्यांच्या जवळ खराखुरा मानवी स्वभाव होता (योहान १:१४;इब्री २:१४) मोशेच्या नियमाशास्त्राधीन ते एक यहूदीच्या रूपात जन्मले होते (जसे सर्व यहूदी).

४:५ **''दत्तक''**-३:१३,१४. जो पर्यंत लोक यहूदी धर्माच्या अधीन होते, त्यांना परमेश्वराची मुले होण्याचा अधिकार मिळूच शकत नव्हता.

४:६ ३:२,१४; रोम ८:१५ पहा ''अब्बा'' अरामी भाषेत वडिलांसाठी शब्द आहे.

४:७ ख्रिस्ती विश्वासू गुलामाप्रमाणे अशी मुले नाहीत, मुले ज्यांना दाबाखाली काम करावे लागते, ती स्वर्गिय बापाची मुले आहेत. ज्यांना सर्व काही फुकट दिले गेले आहे. (१ करिंथ ३:२१-२३).

४:८,९ यहूदी नसलेले आधी खोटया ईश्वरांच्या व मतांच्या बंधनात होते. आता त्यांना खरे ज्ञान मिळाले आहे. आता ते स्वत:ला मोशेच्या नियमशास्त्राधीन करू पाहत होते, म्हणजे गुलामीतून स्वतंत्रेत आल्यानंतर पुन्हा स्वतंत्रते ऐवजी गुलामीत जाऊ पहात होते.

४:१० पौल मोशेच्या नियमशास्त्राबद्दल सांगतो.

''दिवस'' म्हणजे ''शब्बाथ'' ''महिने'' - यहूदी सण.

**''वर्ष''** - शब्बाथा आणि जूबली- योबेल वर्ष (निर्गम २०:८; २५:८-१२). या सर्वांचे उत्तमतेने पालन करणे म्हणजे ''दुर्बळ आणि तुच्छ'' सिद्धांताचा स्विकार करणे (वचन ९). ते दिवस, आत्मिक गोष्टींचे एकचित्र नमूना आणि आत्मिक सत्यतेची केवळ छाया होते. आपण लक्षात ठेवावे की सण-दिवस यांच्या पालनाने किंवा सोडल्याने आपण चांगले किंवा वाईट होत नाही. विश्वासूंचे असे वागणे, त्यांना दास बनवते आणि आत्मिक जीवनाला बिघडवते.

४:११ **''मला भिती वाटते की''**-यहूदयांनी सणवार साजरे करणे ही पौलासाठी एक आश्चर्याची गोष्ट होती. याद्वारे त्याने जाणले की या गोष्टीचा संकेत आहे की खोटे शिक्षक बिघडलेल्या शुभवर्तमानाकडे वळत होते. (१:६,७) तो या विचारात असावा की त्यांनी खरोखर शुभसंदेश जाणला की नाही.

४:१२-२० पौल आवश्यक सिद्धांता बद्दल सांगतो. गलतीयाच्या लोकांत व पौलात जे संबंध होते त्याविषयी सांगतो. येथे त्याचे हृदय एखादया मेंढपाळासारखे वाटते. ते लोक त्याची ''लहान मुले'' आहेत. तो त्यांच्यावर प्रेम करतो व ते त्याला आवडतात.

४:१२ **''माझ्या सारखे''**-पौलाची नियमशास्त्राच्या प्रत्येक तणावा पासून सुटका झाली होती. आणि केवळ स्वर्गिय बापाच्या असीम कृपेतच तो आनंदित होतो. या बाबतीत त्यांनी त्याचे ऐकावे अशी त्यांची इच्छा होती.

**''तुमच्या सारखा झालो''**-ते परराष्ट्रीय होते, म्हणून जेव्हा तो त्यांना सुवार्ता सांगावयास गेला, तेव्हा त्यांच्या सारखा झाला. तुलना करा १ करिंथ ९:२०-२३. तो म्हणतो की जसा तो आहे त्याप्रमाणे तो त्यांच्याशी बोलत नाही, कारण त्यांनी त्याच्याशी वाईट वागणूक केली होती. या उलट, पुढच्या वचनात तो दाखवतो की आपसात त्यांच्यात खूप प्रेम होते.

४:१३ **''शारीरिक दुर्बळता''**-सांगता येत नाही की हा इशारा कशाकडे आहे. हा डोळयांचा रोग होता - (१५)? किंवा २ करिंथ चा ''काटा'' होता ? हा वाईट वागणुकीचा परिणाम होता (प्रेषित १४:१९)? काहीच स्पष्ट नाही.

४:१४ **''दुर्बलता-अस्वस्थता''**-ते विचार करू शकत होते की त्याची ही दुर्बलता त्याला परमेश्वराने दिलेला दंड होता. म्हणून ते त्याला परमेश्वराचा संदेशवाहक मानू इच्छित नव्हते. परंतु अशा प्रकारच्या परीक्षेत ते पडले नाहीत, आणि मोठया सन्मानाने त्याचे स्वागत केले.

४:१५ खोटया शिक्षकांची शिकवण जी मोशेच्या नियमशास्त्राच्या दासत्वात आणणरी होती, पौलाच्या आनंदाला व प्रेमाला नष्ट करत होती. स्वप्रयत्नाने, मुक्ति प्राप्त करण्याची पद्धत, नेहमी, आनंदाला नष्ट करणारीच आहे.

१६ अशी की शक्य झाले असते तर तुम्ही आपले डोळे उपटून मला दिले असते. **आता** काय मी तुमचा शत्रु झालो कारण
१७ तुम्हाला सत्य तेच सांगतो. **ते** तुम्हांला आकर्षित करून आपला मित्र बनवू इच्छितात; परंतु एखादया चांगल्या हेतूने
१८ नव्हे; होय ते तुम्हाला आमच्यापासून वेगळे करू पाहतात. या साठी की तुम्ही मोठया उत्साहाने त्यांचे ऐकावे. **ही** उत्तम
१९ गोष्ट आहे की एखादया चांगल्या गोष्टीचा आवेग असावा मी जो पर्यंत तुमच्या सोबत आहे, तेव्हा नाही? **माझ्या**
२० लहान मुलांनो ख्रिस्ताचे स्वरूप जो पर्यंत तुमच्यात बनत नाही तो पर्यंत मी प्रसूति वेदनांची पीडा सहन करतो. **माझी**
इच्छा आहे की तुम्हांसोबत रहावे, आणि माझी बोली बदलावी, कारण तुमच्या बाबतीत मी बुचकाळयात पडलो आहे.
२१,२२ **मला** सांगा, तुम्ही जे नियमशास्त्राचे पालन करू पाहता तर नियमशास्त्राला समजत नाही काय? **कारण** लिहिले आहे
की अब्राहमाचे दोन पुत्र होते.एक दासी पासून व दूसरा पत्नी पासून. शारीरिक इच्छेने जो दासी पुत्र होता, तो
अब्राहमाचा निर्णय होता परंतु जो पत्नीपासून जन्मला तो परमेश्वराच्या इच्छेपासून मिळणाऱ्या प्रतिज्ञेमुळे होता. या
गोष्टी एक प्रतीक आहेत, कारण हे दोन करार आहेत. एक सिनाय पर्वत आहे. ज्यापासून गुलामी उत्पन्न होते, ही
२५ हागार होय. **म्हणून** ही हागार अरब येथील सिनाय पर्वत आणि वर्तमानकाळातील यरूशलेम दर्शविते जी आपल्या
२६ मुलांबरोबर गुलामीत आहे. **परंतु** यरूशलेम जे वर आहे, स्वतंत्र असून ती आपली माता आहे. कारण लिहिले आहे की
हे वांझ-वंध्ये, तू जी मुलांना जन्म देत नाही, जिला प्रसुतिवेदना नाही आनंदाने आरोळी मार, कारण आशा
२९ सोडलेल्या स्त्रीची मुले पति असलेल्या स्त्रीपेक्षा जास्त आहेत. **आता** बंधु भगिनींनो आपण प्रतिज्ञेची मुले आहोत

---

४:१६ चांगला संदेश लोकांना देणे-सर्वांत मोठे काम होय. परंतु पुष्कळशा अशा कारणाने लोक आपला द्वेष करतात किंवा आपल्याला अस्विकार करतात.

४:१७,१८ **''ते''**-हा शब्द खोटया शिक्षकांकडे संकेत करतो. जे रद्दी संदेश देत होते. (१:६,७) असे लोक नेहमी समूहाचे पुढारी बनू इच्छितात आणि लोकांना आपल्याकडे ओढू पाहतात. रोम १६:१७,१८ शी जुळवा. पौलाची (तो आमच्या करता नमूना आहे) इच्छा होती की लोकांनी परमेश्वराविषयी उत्साही व्हावे. तुलना करा १ करिंथ ३:४-९,२१.

४:१९ गलतीयाचे ख्रिस्ती पौलाची मुले होती. तुलना करा (१ करिंथ ४:१५) त्यांचा नवीन जन्म झाला होता.(योहान ३:४-८) प्रसुतिवेदनेची तुलना ज्या प्रयत्नांशी केली गेली त्यामुळे हे शक्य झाले. गरज ही होती की आता येशू त्यांच्यात योग्य स्वरूपात असावेत. म्हणजे ज्याप्रमाणे पौलात होते त्याचप्रमाणे त्यांच्यात देखील दिसावेत. ३:२, २६-२९ आणि २:२० पहा. या गोष्टीची आवश्यकता होती की त्यांचे विचार व कार्य बदलावेत. (रोम १२:१२, १३:१४; २ करिंथ ३:१८; इफि ४:१३-१५).

४:२० **''बुचकाळयात''** वचन १:६; ३:११ पत्राद्वारे कसा वार्तालाप करावा हे त्याला कळत नव्हते.

४:२१ **''नियमशास्त्राचे पालन''**-त्यापैकी काहींची ही चूक होती. नियमशास्त्राविषयी अपूर्ण ज्ञान यास कारणीभूत आहे याची त्याला जाणीव होती.

४:२२,२३ उत्पत्ति १६:१-४; १७:१५,१६; रोम ४:१८-२१.

४:२४-३१ बायबल आम्हाला अब्राहाम,, त्याची पत्नी सारा व दासी हागार याविषयी काही आत्मिक गोष्टी शिकवू इच्छिते. आपण म्हणू शकतो की बायबलच्या पहिल्या भागाच्या पुष्कळशा बाबी ख्रिस्ताद्वारे चालू केलेल्या नवीन कराराचा एक नमूना व चित्र आहे. घटनांचा व दुसऱ्या गोष्टींचा अर्थ लावताना आपण सावध असावे. परमेश्वराने आपल्या आत्म्याद्वारे विशेष प्रेरणा दिली व अचूक असा शिक्षक बनवला. आपण असे नाही. आजच्या सध्याच्या काळात बायबलचे मोठे विचित्र आणि आत्मिक अर्थ लावले जातात.

४:२४,२५ हागार सिनाय पर्वतावर केलेला जुणा करार दर्शविते(निर्गम १९) सारा मत्तय २६:२८ चा नवा करार (नवा प्रबंध) जो येशूने केला दाखवते. हागार एक दासी मुलगी होती तिचे मूल अब्राहामाद्वारे मुक्तरूपाने जन्मलेल्या मुलाप्रमाणे स्वतंत्र म्हणवणारे नव्हते. हागार मोशे द्वारे दिलेल्या नियमशास्त्राचे प्रतिबिंब आहे जो सिनाय पर्वतावर दिला गेला होता. तो पृथ्वीवरील यरूशलेम सुद्धा आहे जो जुन्या कराराच्या अभ्यासाचे केंद्र होता. पौलाच्या मते नियमशास्त्र म्हणजे आत्मिक बंधन किंवा गुलामी (वचन१,९; ३:१०,२३)

४:२६ सारा नवीन करार आणि स्वर्गिय यरूशलेमे कडे केलेला इशारा आहे. जे नव्या करारा (इब्री १२:२२) च्या आत्मिक सत्यतेचे केंद्र आहे. ते गुलामी किंवा बंधन नाही. आता विश्वासूं यरूशलेमेशी जुळलेले आहेत, जुण्या यरूशलेमाशी नव्हे.

४:२७ यशया ५४:१ पहा. येशू ख्रिस्ताद्वारे स्थापित उत्तम गोष्टी व इस्त्राएलच्या नवीन युगाच्या महान भविष्याबाबत यशया ने सांगितले. आधी हे निष्फळ होते परंतु यहोवा परमेश्वराच्या कृपेने आणि शक्तिने फलदायी ते होईल.

४:२८ अब्राहामाने परमेश्वराच्या प्रतिज्ञेवर भरंवसा केला आणि त्याला इसहाक मिळाला. अद्‌भुत कार्य करणाऱ्या, जीवन देणाऱ्या, परमेश्वरीय वचनाद्वारे इसहाक या जगात आला. याचप्रमाणे विश्वासू नवीन जीवन प्राप्त करून; अब्राहमाचे आत्मिक वंशज बनतात (याकोब १:१८; १ पेत्र १:२३). येथे ''करार'' ''प्रतिज्ञा'' मोशेच्या नियमशास्त्रा विपरित आहे.

४:२९ उत्पत्ति २१:८,९ पहा. साधारणत: जसे लोक जन्म घेतात तसाच इश्माएल जन्मला. त्याचा जन्म अलौकिक नव्हता. ज्यावेळी इसहाकाचा जन्म अशक्य गोष्ट होती त्यावेळी परमेश्वराच्या आत्म्याने कार्य केले. (इब्री ११:११,१३; रोम ४:१८-२१). जसे इश्माएलाने इसकाला छळले, तसेच जुण्या कराराच्या लोकांना (ख्रिस्ताच्या लोकांना). पहा प्रेषित ५:४०; ७:५४-५८; १३:४९,५०; १४:१९. प्रत्येक युगात नवीन जन्म प्राप्त लोकांना छळतील.

३० **ज्याप्रमाणे** देह स्वभावाने जन्मलेल्या आत्म्यानुसार जन्मलेल्याचा छळ केला. तसाच आता देखील होत आहे. बायबल
काय म्हणते? दासी व तिच्या पुत्राला घालवून दया कारण दासीपुत्र, स्वतंत्र्य स्त्रीच्या पुत्रा बरोबर वारीस होणारच
३१,**५** नाही. **म्हणून** भाऊ-बहिणींनो, आपण दासीची मुलें नाही परंतु स्वतंत्र स्त्रीचीं आहोत. **हया** स्वतंत्र्या करता ख्रिस्ताने
२ आपल्याला स्वतंत्र केले म्हणून त्यात मजबूतीने स्थिर रहा. गुलामी च्या बंधनात राहणे स्विकार करू नका. **मी पौल**
३ तुम्हास सांगतो की जर तुम्ही सुंता करून घेतली तर तुम्हाला ख्रिस्ताचा काही फायदा होणार नाही. **मी** गंभीरतापूर्वक
४ प्रत्येक व्यक्तिसमोर घोषणा करतो की जो सुंता करतो त्याला सर्व धार्मिक नियमांचे पालन करावे लागेल. **तुम्ही जे**
नियमशास्त्राद्वारे नितीमान ठरविले जाऊ इच्छिता, येशू तुमच्या पासून एका अंतरावर ठेवले गेले आहेत.तुम्ही
५ अतिमहान कृपेपासून वंचित आहात. **आत्म्याद्वारे** आम्ही त्या नितीमत्तेच्या आशेची प्रतिक्षा करतो जी विश्वासाने
६,७ प्राप्त होते. **येशू** ख्रिस्तात सुंता केलेले किंवा न केलेले काहीही प्राप्त करू शकत नाहीत, केवळ प्रेमाद्वारे विश्वास. **तुम्ही**

---

४:३० **"बायबल"** - उत्पत्ति २१:१० आत्मिक अर्थ हा आहे की जे लोक आपल्या प्रयत्नांनी आणि नियमशास्त्राद्वारे तारण इच्छितात
ते स्वतंत्र नाहीत. परमेश्वरीय कृपेद्वारे तारण प्राप्त व स्वतंत्रता प्राप्त लोकांसोबत त्यांची जागा नाही. हे दोन भिन्न आहेत, जे एक होऊ शकत नाहीत. जुणा करार (प्रबंध) आणि नवा करार (प्रबंध) मिळून तिसरे काहीही बनू शकत नाही. असा कोणताहि प्रयत्न एक बिघडलेला शुभसंदेश बनवतात (१:७).

४:३१ याचा सरळ अर्थ असा आहे की ख्रिस्ती विश्वासूंचा मोशेचे नियम, जुणा करार (प्रबंध) किंवा यहूदी मताशी कोणताच संबंध नाही. ती नव्या कराराची मुले आहेत. सुवार्तेच्या प्रतिज्ञेच्या बळावर परमेश्वरीय शक्तिने त्यांचा नवीन जन्म झाला आहे. नवीन व जुण्या कराराच्या तुलनेसाठी पहा-२करिंथ ३:१६-१८; इब्री ८:६; १०:१८; १२:१८-२४.

५:१ अशी कोणतीहि शिकवण जी रिती- विधि व नियमांद्वारे मुक्तिचा करार करते तो एक गुलामीचा फास (४:३-९) आहे. येथे विशेषकरून मोशेचे नियमशास्त्र त्याच्या विचारात होते. प्रेषित १५:१०,११ शी जुळवा. येशूने आपल्याला या प्रकारच्या ओझ्यापासून मुक्त केले आहे. म्हणजेच प्रत्येक तऱ्हेच्या धार्मिक बंधनातून स्वतंत्र केले आहे; मग ते यहूदी मत असो किंवा कोणत्याहि धर्माचे किंवा विकृत. ख्रिस्ती मताचे. स्वतंत्र म्हणजे पूर्णत: स्वतंत्र. या स्वतंत्रतेची किंमत ख्रिस्ती विश्वासूंनी जाणून त्याला हातातून जाऊ देऊ नये ते ख्रिस्ताशी जुळलेले आहेत. मत्तय ११:२८-३० याच बंधनांची त्यांना गरज आहे. हेच बंधन खरी स्वतंत्रता आणते.

५:२-१२पौल स्पष्ट भाषेत सांगतो की नियमशास्त्र आणि अट नसलेली कृपा यांचा मेळ अशक्य आहे. कोणत्याहि एकाची निवड करावी लागणार. आपल्या प्रयत्नांनी विश्वास व रीतिविधिंनी किंवा बलिदानांनी तारण प्राप्त करणे अशक्य आहे.

५:२ **"मी पौल"**-पूर्ण अधिकाराने तो बोलतो (१:१) त्याला येशूचे ज्ञान प्राप्त झाले होते (१:१२).

**"सुंता"**-उत्पत्ति १७:११-१४; प्रगटी १२:३.

शारीरिक सुंतेचे काहीही महत्व नाही. त्यांची जी स्थिति होती त्यालाच उद्देशून पौल बोलतो. गलतीयावासींनी जर खोटया शिक्षकांचे ऐकून तसे केले असते किंवा सुंता केली तर मोशेच्या नियमांचे पालन केल्यामुळे नवीन प्रबंधाचा लाभ ते प्राप्त करू शकत नव्हते.
५:३ याचा अर्थ असा की सुंतेमुळे ते यहूदी मताचे बनतील. ज्याप्रमाणे तो दाखवतो की यापासून आशीर्वाद (लाभ) नव्हे तर शाप (हानिच) होईल (३:१०-१२).

५:४ **"ख्रिस्त तुमच्यापासून एका अंतरावर ठेवले गेले आहेत"** याचा अर्थ आहे की असे लोक जे स्वत:च्या जीवनात ख्रिस्ताला कार्य करू देत नाहीत, व स्वत:ला वेगळे ठेवतात. असीम कृपेच्या क्षेत्रात येशू क्रियाशील आहेत. परंतु ते लोक या मोठया कृपेकडे आपली पाठ करतात.

**"कृपेपासून वंचित"**-पौलाचे म्हणणे असे नव्हे की विश्वासू असे करतीलच. त्याला निश्चय होता की गलतीयाचे विश्वासू जरी कच्चे होते, तरी ते तसे कधीहि करणार नाहीत (वचन १०) तो या सिद्धांतावर भर देतो की नियमशास्त्र व अट-हिन कृपा या दोहोंना एक करता येत नाही. कर्म आणि विश्वास यात कोणतीच बाब सामान्य नाही. नियम-रीती विधि यांचा आधार घेणे कृपामार्गाच्या विरूद्ध जाणे होय. पौल असे म्हणत नाही की वाईट कृत्यें केल्यामुळे तारण काढून घेतले जाऊ शकते. (तुलना करा रोम ५:९,१०; ८:२९-३९; १ योहान १:९;२:१)

**"कृपेपासून दूर गेलात"**-ज्या परीक्षा आपल्यावर येतात असा आशय येथे नाही. त्याचा इशारा त्या कृपेकडे आहे ज्यापासून तारण प्राप्त होते. जे वचनात पक्के नाहीत, त्यांच्यासाठी ही संभावना आहे की ते खोटया शिक्षकांद्वारे फसवले जाऊ शकतात. मुक्तिच्या कृपामार्गाला नेहमी करता त्यागणे संभव नाही कारण जर असे आहे तर, स्पष्ट जाहिर होते की ते ख्रिस्ताचे नव्हतेच (१ योहान २:१९) येशू आपल्या मेंढरांना सांभाळतील आणि ती स्थायी रूपात नष्ट होणार नाहीत. (योहान १०:२७,२८;१७:११-१२).

५:५ **"आम्ही"**-ख्रिस्तातील खरे विश्वासू, स्वत:च्या प्रयत्नांना तारणाचा उपाय मानत नाहीत. कोणत्याहि प्रकारचे धार्मिक नियम बंधन आणि मृत्यू ओढावतात. परमेश्वराच्या प्रतिज्ञा पूर्ण होण्याची आशा, विश्वास उत्पन्न करते. (३:१८,२९) रोम ८:२३-२४ शी जुळवा. "नितीमत्व" ती नितीमत्ता(निर्दोषता) नव्हे जी विश्वासूला मिळते (२:१६; रोम ३:२१-२४; ५:१) ही पूर्णत: संपूर्ण निर्दोषता (सिद्धांत) आहे, ही भविष्यातच आहे.

५:६ ६:१५; १करिंथ ७:१९; रोम २:२८,२९; ४:९-१२ पहा.

ही गोष्ट कोणत्याहि बाहेरील रीति-विधि करता खरी आहे. कोणतीहि गोष्ट स्वर्गिय पित्यासमोर आम्हाला ग्रहणयोग्य बनवू शकत नाही. पिता त्यांना विश्वासाद्वारे वाचवतात. त्यानंतर त्यांनी ख्रिस्ताची (सर्वांशी प्रेम करण्याची) योहान १३:३४;१५:२ पाळली पाहिजे. जर आमचा भरंवसा येशूवर नाही, आम्ही त्यांच्यावर प्रेम करत नाही, तर रीति-विधि पूर्ण करण्यात काय फायदा? विश्वास, ज्याद्वारे प्रेम उत्पन्न होते, एक महत्व पूर्ण गोष्टच नव्हे तर अति आवश्यक देखील आहे.

८ चांगले धावत होता. तुम्हाला कोणी अडथळा केला की सत्याला मानू नये? **ही** शिकवण तुम्हाला त्यापासून मिळत नाही
९ ज्याने बोलावले आहे. **थोडेंसे** खमीर पूर्ण कणकेचा गोळा खमीर करते. येथून मला तुमच्यावर भरवसा आहे की तुमचा
१० काही आणखी विचार नाही. जो तुमचा छळ करत आहेत, मग ते कोणी हि असो त्यांना त्यांचा मोबदला मिळेल. **मला**
ख्रिस्तात तुमची खात्री आहे की तुम्ही दुसरी शिकवन स्विकार करणार नाही. जे तुम्हाला त्रास देत आहेत, मग ते कोणी
११ का असेनात, दंड भोगतील **भाऊ-बहिणींनो** माझ्या दृष्टिकोनातून आत हि मी सुंतेचा संदेश देतो तर अजूनहि माझा
१२ छळ का होत आहे. जर असे असेल तर वधस्तंभचे अडखळण नाहीसे झाले आहे.**जे** तुम्हाला छळतात त्यांनी स्वत:ला
१३ छेदून घतले तर बरे होईल. **भाऊ-बहिणींनो** तुम्हाला स्वत्रंतेकरता बोलवले गेले आहे परंतु या स्वतंत्रतेचा उपयोग
१४ आपल्या दैहिक इच्छा पूर्ण करण्यासाठी करू नका. या ऐवजी प्रेमाने एकमेकाची सेवा करा. **पूर्ण** नियमशास्त्राची एक
१५ पूर्णता यातच आहे की "जशी आपणवर तशी आपल्या शेजाऱ्यावर प्रीति करा. **जर** तुम्ही एकमेकांना घायाळ करता,
१६ तर सावध असा, परस्परांचा संहार करून एकमेकांचा जीव घेवू नका. **म्हणून** मी म्हणतो, आत्म्याच्या प्रेरणेने जीवन

---

५:७ **"चांगली धाव"** - १ करिंथ ९:२४; इब्री १२:१.
**"तुम्हाला कोणी अडथळा केला"**-१:७.

५:८ यहोवा परमेश्रानेच त्यांना बोलवले (१:६).
सत्य पालनापासून त्या लोकांना ज्याने वेगळे ठेवले होते, ते परमेश्वर नव्हते.

५:९ १ करिंथ ५:६-८ पहा. लहानशी खोटी शिकवण पूर्ण मंडळीला खराब करू शकते.

५:१० त्यांनी दूर जाण्याची गोष्ट बजावल्यानंतर (वचन ४) तो आपला भरंवसा त्यांच्यावर दाखवतो की त्यांच्या सोबत असे घडणार नाही या गोष्टीचा निश्चय स्वत: प्रभुने त्याला दिला होता आणि ज्या सत्याबद्दल त्याने त्यांना लिहिले आहे त्यांशी ते सहमत होतील. इब्री ६:९ ची तुलना ६:४-८ शी आणि इब्री १०:३९ ची १०:२६-३१ शी करा. खोटया शिक्षक/शिक्षकां करता हीच गोष्ट सत्य आहे की जो दिशाभूल करतो/करतात ते/तो परमेश्वरीय दंडाचे भागीदार आहे/आहेत. जुळवा २ पेत्र २:१-३.

५:११ जर कोणी त्या ठिकाणी म्हटले असते की-तारणासाठी सुंता आवश्यक आहे, अशी शिकवण पौल देतो तर, ही गोष्ट खोटी झाली असती.
**"छळ"**-यहूदी लोक पौलाचा छळ करत होते कारण तो त्यांना शिकवत होता की तारणासाठी मोशेचे नियमशास्त्र आवश्यक नाही आणि ख्रिस्ती लोकांसाठी सुंतेचे काहीच आत्मिक महत्व नाही.
**"वधस्तंभची अडखळण"**-१ करिंथ १:२३ शी तुलना करा. हे कष्ट म्हणजे काय? परत मोशेच्या नियमशास्त्रा कडे गेल्यावर हे कष्ट संपुष्टात कसे येते? लोकांना या गोष्टीचा त्रास होतो की ख्रिस्ताचा वधस्तंभ, मानवाचा पापामुळे पूर्ण नाश होतो याची घोषणा करतो. यावरून स्पष्ट होते की कार्याने, प्रयत्नाने, धर्माने, नियमाने आणि प्रार्थनेद्वारे तारण प्राप्त करू शकत नाहीत. वधस्तंभ या गोष्टीची देखील घोषण करतो की त्यांची मात्र आशा म्हणजे त्यांच्या ठिकाणी परमेश्वराच्या पुत्राचे मरण होय. वधस्तंभामुळे लोकांच्या गर्वावर थापड बसते, आणि ते येशूंच्या चरण-धुलीपर्यंत येतात. त्यामुळे त्यांना त्रास होतो. वधस्तंभाचा लोकांना अडथळा होणार नाही, जर त्यांना म्हटले की तारणासाठी धार्मिक नियम आणि प्रथांचे पालनपर्याप्त आहे. ते असा विचार करतात की चांगली कार्ये करून ते स्वर्गिय बापाला प्रसन्न करू शकतात. त्यांच्या गर्विष्ठ आंधळया मनाला ही शिकवण बरी वाटते.

५:१२ **"जे तुम्हाला छळतात"**-शिक्षक गलतीयाच्या लोकांना परमेश्वराच्या सत्याचा विरोधा करण्यास भडकवित होते, असे शिक्षक मंदिरातील मूर्त्यांच्या डोकेफिरू पंडितापेक्षा चांगले नाहीत, कारण ते स्वत:च्या शरीराची कापाकापी करतात; असे पौल म्हणतो.

५:१३ या विषयावर पौल व्यावहारिकपणे बोलतो. ही त्याची नेहमीची पद्धत होय. सर्वप्रथम तो कोणत्याहि सत्याचा पाया रचतो आणि नंतर ख्रिस्ती लोकांची विनवणी करतो, की त्याप्रकारे जीवन जगावे. तुलना करा. रोम १२:१२; इफि ४:१.
**"स्वतंत्रता"**-येशूने आम्हाला वाईट कामे करत राहण्यासाठी स्वतंत्र केले नाही. (दुष्टता करणे ही स्वतंत्रता नव्हे, पण सर्वात धोकादायक गुलामी होय- योहान ८:३४; रोम ६:१६. येशू यासाठी आपल्याला स्वतंत्र करतात की आपण यहोवा परमेश्वर व आपसांत एकमेकांचे मनापासून चाकर बनावे) पहा रोम ६:१५-२३.
"शारीरिक इच्छा पूर्ण करणे" ग्रीक भाषेत "सार्क्स" बद्दल पौल सांगतो, स्वभावाने आम्ही तसेच आहोत. पहा रोम ७:५,१८; ८:३,५; येशू चे विश्वासू नियमशास्त्रापासून यासाठी स्वतंत्र; नाहीत की त्यांनी आपली दुष्ट कामे करत राहावीत. अगदी याच्या उलट आहे. पहा (रोम ६)

५:१४ ते नियमशास्त्र का मानू इच्छित होते (४:१)? पौल म्हणतो नियम विधि विसरून जा आणि नियमशास्त्राचा सारांश, जे प्रेम आहे त्याचा स्विकार करा. (लेवीय १९:१८; मतय २२:३९; रोम १३:८-१०, याकोब २:८). खरे पाहिले तर जे ख्रिस्तावर भरंवसा ठेवतात आणि ज्यांच्याजवळ पवित्र आत्मा आहे त्या लोकांतच नियमशास्त्राचा सारांश पूर्ण होतो. (रोम ८:४).

५:१५ खोटे, शिक्षक येथे भांडणे व तोडफोडीचे काम करत होते. हा त्यांच्या कामाचाच एक परिणाम होता (रोम १६:१७) परमेश्वराची इच्छा आहे की त्यांच्या लोकांनी प्रेम व सत्यता या दोहोंत जुळलेले असावे. अशा प्रेमात नव्हे ज्यात सत्य नाही किंवा अशा सत्यात नव्हे ज्यात प्रेम नाही. चूका व भांडणे ही दोन्ही मंडळीला उध्वस्त करून टाकतात. सत्य व प्रेम त्यांना आत्मिक रीतिने जिवंत आणि वाढत राहण्यास मदद करतात.

५:१६ **"जीवन जगणे"** किंवा **"वागणूक"** किंवा "पुढे जाणे" येथून ६:१० पर्यंत पौलाचा हाच विषय आहे. आत्म्याचा इशारा, पवित्र आत्म्याकडे तो करतो. कारण या द्वारे ख्रिस्ती लोकांना ख्रिस्तासारखे जगण्याची शक्ति मिळते. रोम ७:१४-२५; १३:१४, १ योहान १:८ देखील पहा या वाईट इच्छेवर आपण नियंत्रण ठेवू शकतो.

१७ जगा म्हणजे तुम्ही आपल्या इच्छेने जगणारच नाही. **कारण** जुणा स्वभाव पवित्र आत्म्याच्या विरोधात, हे परस्पर
१८ विरूद्ध आहेत. यासाठी की तुम्ही ते सर्व करू नये, जे करू इच्छिता. **जर** तुम्ही पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शनाने
१९,२० जीवन जगता, तर तुम्ही नियम शास्त्राच्या अधीनतेत नाही. **जुण्या** स्वभावाचे कार्य हे सर्व आहेत: व्यभिचार अशुद्धता,
२१ जारकर्म, दुष्टता कामातुरपणा, जादू-टोना वैर, मत्सर, क्रोध, हत्या, दारूबाजी इत्यादि. **मी** या विषयी पूर्वी जे सांगून
२२ ठेवले आहे, ते हे आहे की जे हे सर्व करत राहतात यहोवाच्या राज्यात प्रवेश करणर नाहीत. **परंतु** पवित्र आत्म्याचे
२३ फळ, प्रेम आनंद शांति सहनशीलता, दयाळुपणा, चांगुलपणा, विश्वास **नम्रता** आणि संयम आहेत. या सर्वांच्या विरूद्ध

---

५:१७ परमेश्वराचा आत्मा आणि या वाईट इच्छा (मनुष्याचा पतित पापी स्वभाव) यात कोणतीही एकता नसते. (रोम ८:५-८). नेहमी त्यांच्यात युद्ध चालणार. परमेश्वराचा आत्मा या वाईट इच्छांशी युद्ध करेल आणि त्याच्या गरजा पूर्ण करणारे नाही. पौलाचे शब्द ''तुम्ही ते सर्व करू नये, जे करण्याची तुमची इच्छा आहे.'' याचा अर्थ, ख्रिस्ती लोक ते सर्व चांगले करत नाही, जे करण्याची त्यांची इच्छा असते कारण त्यांची जुणी इच्छा यात बाधक होते. (रोम ७:१५,१८,२०) याचा अर्थ असा सुद्धा होऊ शकतो की वाईट इच्छेला ते तृप्त करत नाहीत कारण त्यांच्या आतील पवित्र आत्मा त्या इच्छांना विरोध करतो याऊलट पौल दूसरी गोष्ट शिकवतो- विजय प्राप्त करण्याचा मार्ग म्हणजे परमेश्वराच्या आत्म्याद्वारे जीवन जगणे होय.

५:१८ ''पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शनात चालत रहा'' - रोम ८:१४ पहा. परमेश्वराच्या आत्म्याने विश्वासूंना धार्मिक बंधनातून मुक्त करून, स्वप्रयत्नांनी तारण प्राप्त करण्याच्या मार्गापासून दूर नेले आहे. पुन्हा तो आम्हाला त्याच गोष्टीत ढकलत नाही.

''नियमशास्त्राच्या अधीनतेपासून मुक्त'' - रोम ६:१४. कधीकधी लोकांचा विचार असतो की इच्छा व दैहिक कामांना दाबण्यासाठी नियम व रीति असावी. पौलाला माहित होते की अशा गोष्टी कधी कधी वाईट इच्छा किंवा वाईट बाबींना उत्तेजन देत असतात. पहा रोम ५:५; ७-१३. परमेश्वराच्या आत्म्याने शारीरिक इच्छांना मारले जाऊ शकते याची पौलाला जाणीव होती.

५:१९-२१ ती अनैतिकता, स्वार्थ, भांडण, दारूबाजी या सर्वांना तो मूर्तिपूजेचाच दर्जा देतो, आत्मिक लोकांसाठी हे ''स्पष्ट जाहिर'' आहे की या गोष्टी आतून येतात. जुळवा मत्तय १५:१९; मार्क ७:२१-२३; रोम १:२१-३२; ३:९-१-१८. काही गोष्टी येथे सरळ लोकांच्य विरोधात, काही परमेश्वराच्या विरोधात आणि काही वाईट कामे करणाऱ्यांचा विरोधात देखील; त्या सर्व नुकसान करतात, आणि परमेश्वराचा क्रोध व न्यायाच्या लायकीचे आहेत.

''मूर्तिपूजा''- निर्गम २०:३-६ इत्यादि.

''जादूटोना''- अनुवाद १८:९-१२.

''भांडणे'' चुकीची शिकवण'' - १:६,७; १ करिंथ ३:३,४.

'द्वेष- नीति १४:३०; २७:४; मत्तय २७:१८; प्रेषित १७:५; याकोब ३:१४,१६.

५:२१ ''करत राहतात'' - ''अभ्यास करतात''

''यहोवाच्या राज्यात प्रवेश करणार नाहीत''- पहा ६:७,८; १करिंथ ६:९,१०; इफि ५:५,६. प्रगटी २१:८. असे असूनहि लोक असा विचार करतात की वाटेल ते करून देखील त्यांचा बचाव होईल. अशा लोकांपासून दूर रहा. त्यांनी स्वत:ला धोका दिला आणि आता आम्हाला ही देऊ इच्छितात. ''परमेश्वराचे राज्य'' (मत्तय ४:१७) वरील नोट्स पहा.

५:२२-२३ या गोष्टी विश्वासूच्या आत्म्यातून बाहेर येत नाहीत, परंतु त्यांच्या आत जो पवित्र आत्मा आहे त्यापासून निघतात. सर्वांच्या प्रयत्नांनी असे होत नाही. याचा अर्थ असा देखील नव्हे की काही न करता,, हातावर हात देऊन बसावे. पवित्र आत्म्याचे मार्गदर्शन आवश्यक आहे. अन्यथा जीवनात फळे येणार नाहीत. ''फळ'' शब्द उन्नतिची क्रिया दर्शवितो. मत्तय १३:२३ शी जुळवा. जर फळ हवे तर बी पासून सुरू करावे लागणार. यानंतर रोपटे किंवा वृक्ष यानंतर कळी, मग फूल आणि शेवटी फळ. आत्मिक फळ असेच येते जेव्हा आपण ख्रिस्ताचा स्विकार करतो तेव्हा प्रेम, आनंद आणि शांति आपल्या मनात येते. या सर्व गोष्टींची वाढ झाली पाहिजे. संयम, प्रामाणिकपणा, स्वत:वर नियंत्रण या सर्व गोष्टी हळू-हळू वाढत जातात. तुलना करा २ पेत्र १:५-८. या यादीतील सर्व गुण आमच्यात असावेत अशी स्वर्गिय बापाची इच्छा आहे. पवित्र आत्म्याद्वारे असे होते देखील. पौल प्रेमाला सर्वात वर ठेवतो. ते सर्वात महान आहे; याची पौलाला जाणीव होती. (वचन ६:१४; १ करिंथ १३:१३).

**''आनंद''** - योहान १५:११; १६:२०-२२; १७:१३; रोम ५:११; १४:१७; १५:१३. ज्या प्रसन्नतेचा लाभ लोक घेतात ती बहुधा बाहेरील गोष्टींवर अवलंबून असते. विश्वासूंचा आनंद अनंतकालिक गोष्टींवर टिकलेला आहे.

**''शांति''** - लूक २:१४; योहान १४:२७; १६:३३; रोम १:७; १४:१७; १५:१३.

**''संयम''**-ग्रीकभाषेत हा एक शब्द आहे, याचे दोन अर्थ आहेत. रोम ५:३; कलस्से १:११; इब्री ६:१२; १०:२६; १२:१; याकोब १:३,४.

**''कोमलता''** -(ग्रीक भाषेत हा ''सज्जनता'' पेक्षा जास्त योग्य शब्द आहे) २ करिंथ ६:६; इफि २:७; तीताला ३:४.

**''चांगुलपणा''** - रोम १५:१४; इफि ५:९.

**''विश्वास किंवा विश्वास योग्यता''** - मत्तय २४:४५; २५:२१; १करिंथ ४:२; ७:२५; प्रगटी १७:१४.

**''नम्रता''** -मत्तय ११:२९; २ करिंथ १०:१; १ थेस्स २:७.

**''संयम''** - २ तीमथ्य १:७; १ करिंथ ९:२५-२७; २ पेत्र १:६,हे सर्व गुण परमेश्वराचा आत्मा देतो. यासाठी की आपल्या जीवनात ते रहावेत. आपण स्वत: त्यांच्यासाठी बाधाबनू शकतो किंवा उन्नति सुद्धा करू शकतो.

२४ नियमशास्त्र नाही.**जे** ख्रिस्त येशूचे आहेत; त्यांनी अभिलाषा आणि इच्छांसहित जुण्या स्वभावाला वधस्तंभावर खिळले
२५,२६ आहे. **जर** आम्ही पवित्र आत्म्यात जिवंत आहोत तर, त्यानुसार आमचे जीवन असावे. **आम्ही** खोटी प्रशंसा करणारे,
**६** एकमेकांना चीड आणणरे नसावे व एकमेकांचा हेवा करणारे होऊ नये. **बंधुभगिनींनो** कोणीहि अपराधात पडू
शकतो. तुम्ही जे आत्मिक लोक आहात, सर्तक रहा, तुम्ही पापात पडता कामा नये. अपराध्याला नम्रतेने ताळयावर
२,३ आणा. **एक मेकांची** ओझी वाहा आणि ख्रिस्ताचा नियम पूर्ण करा. **कारण** आपण कोणी नसतांना कोणी तरी आहो,
४ अशी कल्पना करणारा स्वत:ला फसवितो. **प्रत्येक** व्यक्तिने आपल्या कामाची परीक्षा करावी आणि करून दाखवावे,
५ तेव्हा त्याला अन्य कोणावर नव्हे तर स्वत:वर अभिमान करण्याची संधि मिळेल. **कारण** प्रत्येकाला आपल्या स्वत:चा
६,७ भार वाहावा लागणारच. **ज्याला** वचनाचे शिक्षण मिळाले आहे त्याने सर्व चांगल्या पदार्थाचा वाटा त्यांना दयावा. **धोक्यात**
राहू नका; परमेश्वराला कोणीही फसवू शकत नाही. माणूस जे कांहि पेरतो तेच कापेल. जो आपल्या मनानुसार जगेल तो

---

५:२४ असे सर्व खऱ्या विश्वासूंच्या जीवनात घडते. थोडया लोकांबरोबर नव्हे तर सर्व ख्रिस्ती लोकांसोबत २:२० यात पौल येशू बरोबर वधस्तंभ चढण्याबद्दल सांगतो, विश्वासूने काय केले या बद्दल तो येथे सांगतो. तो असे म्हणत नाही की विश्वासूंनी असे करावे, तर हे की त्यांनी असे केले आहे. जेव्हा त्यांनी येशूवर विश्वास ठेवला तेव्हा तसे झाले. मनाचा पालट म्हणजे, जुण्या जीवनाच्या शैलीपासून बाजूला होणे, त्या जुण्या वाईट "स्वत:च्या पंज्यापासून" मुक्त होणे. ख्रिस्तावरचा विश्वास, ख्रिस्ताचे आपल्या करता झालेले मरण ग्रहण करतो. दूसऱ्या शब्दात असे मन बदलण्याच्या क्रियेने आणि ख्रिस्तावरील विश्वासाने आपण म्हणतो, "ख्रिस्तास नव्हे, तर मला वधस्तंभावर चढवायला हवे होते! तसे पाहिले तर हा विचार सुरवातीला कोणाच्याच मनात नसतो. त्यांचे म्हणणे आहे की त्यांच्या वाईट स्वभावासांठी वध स्तंभच योग्य स्थान आहे. परमेश्वराच्या न्याय घोषणेसाठी ते सहमत आहेत.

आपला 'स्व' नाकारून, आपला वधस्तंभ उचलून ते येशू ख्रिस्ताचेच म्हणणे ऐकू इच्छितात. (मत्तय १०:३८,३९). १६:२४-२६ चे नोट्स पहा. जर लोक असे करत नाहीत तर ते खऱ्या येशूचे खरे शिष्य नाहीत हे स्पष्ट जाहिर होते. येथे पौल खऱ्या विश्वासूची व्याख्या सांगतो जर त्यांनी आपल्या दुष्ट स्वभावाचे बलिदान केले नसेल तर ते ख्रिस्ताचे नाहीत.

तरीही हा अंश (वचन १६) आम्हाला विचार करण्यास बाध्य करीत नाही की विश्वासूला जुण्या स्वभावातील उरलेल्या गोष्टींपासून त्रास होणार नाही; परंतु पौल दाखवतो की याच्या उलट सत्य आहे. परमेश्वर आणि दुष्टते विरूद्ध विश्वासूची वागणूक अशी असते की येशू त्यांच्या ठिकाणी वधस्तंभवर चढले, तेथे त्यांनी दुष्ट स्वभावाला क्रूसवर वध केले आणि ख्रिस्ताबरोबर एक झाले आहेत. (रोम ६:४-७). आज दोन विचार आहेत- एकानुसार जुणा स्वभाव मेला- सडला- आणि पुरला गेला; दुसऱ्यानुसार असे नाही. परंतु विश्वासूतील पापी स्वभाव मेला आणि पुरला गेलेला नाही. तो पुन्हा त्यांच्या जीवनात येऊ शकतो, (वचन १७) यासाठी ख्रिस्त म्हणतात, आपण 'दररोज' आपला वधस्तंभ उचलावा -लूक ९:२३.

**"जुणा स्वभाव वधस्तंभावर चढवून दिला."**-तो विश्वासूंना त्यांच्या पापी स्वभावाबद्दल आणि ख्रिसताच्या वधस्तंभविषयी सांगतो.

५:२५ परमेश्वराच्या आत्मयाने सर्वांना आत्मिक जीवन दिले आहे. (योहान ३:३-८). कारण जेथे आत्मा प्रेरणा देतो तेथे त्यांनी जावे, हे खरे आहे. पापमय जीवनावर विजय प्राप्त करण्याची ही एक शैली आहे. याची एकच जागा आहे. ती म्हणजे वधस्तंभ.

५:२६ रोजच्या जीवनात आत्म्याच्या प्रेरणेने जगण्यासंबंधी पौल सांगतो. पवित्र आत्मा खोटेपणा, भांडणे आणि हेवा पसंत करत नाही. आम्ही देखील तसेच करावे.

६:१ **"नम्रतेने"**-५:२३; २ तीमथ्य २:२४,२५ -जो व्यक्ति परीक्षेत पडतो त्यावर दोष लावणे, कठोर शब्दांत बोलणे त्याला परत आणण्याची पद्धत नव्हे. तुलना करा लूक २२:६०-६२; मार्क १६:७; योहान २१:१५.

"पापांत पडू नका"-जे लोक आत्मिक आहेत, त्यांनी असे समजू नये की ते प्रलोभन व पाप यापासून मुक्त आहेत.(१ करिंथ १०:१२)

६:२ विश्वासू मोशेच्या नियमशास्त्राधीन नाहीत (३:२५; ५:१) ते ख्रिस्ताच्या नियमाशास्त्राधीन आहेत. हा प्रेमाचा नियम आहे (योहान १३:३४) जर आपण आपल्या सोबतच्या विश्वासूंशी प्रेम करू तर त्यांचे जीवन ज्या त्रांसातून व कष्टांतून जात असेल त्या प्रत्येक बाबतीत त्यांची मदत करण्यास तत्पर असू.

६:३ वचन २ ला पूर्व करण्यात सर्वात मोठा अडथळा आहे. खोटेपणा (५:२६) आहे. जर दूसऱ्यांना मदत करायची असेल तर स्वत: योग्य वर्तणूक ठेवावी. ही योग्य शैली लूक १७:१०; रोम १२:१६; १करिंथ ३:५-६; फिली २:३ यात पहा.

६:४ २ करिंथ १०:१२-१८ पहा. जर आपल्याला वाटते की आपण दूसऱ्या विश्वासूंपेक्षा उत्तम, आहोत, किंवा दूसऱ्यांच्या तुलनेत आपली सेवा चांगली आहे तर आमच्या आत गर्व येईल आणि वचन २ पूर्ण होऊ शकणार नाही.

६:५ प्रत्येक व्यक्ति आपल्या स्वत: बद्दल परमेश्वराच्या प्रति जबाबदार आहे, दूसऱ्यांकरता नव्हे (योहान २१:२२; रोम १४:१२).

६:६ १ करिंथ ९:९-१४; रोम १५:२६,२७; १ तीमथ्य ५:१७,१८ शी तुलना करा.

६:७ ही सत्यता संपूर्ण बायबल मध्ये आहे-लेवीय २६:३-१७; अनुवाद ३०:१५-१८; होशेय ८:७; १०:१२. नीति २२:८;स्त्रोत १८:२५:२७; ईयोब ४:८; २ करिंथ ९:६.

६:८ दोन प्रकारे जीवन जगता येते. स्वत:ला प्रसन्न करणे ("शरीर") किंवा परमेश्वराच्या आत्म्यास प्रसन्न करणे. एकाचा अंत सर्वनाश तसे व्हायला हवेच. दूसऱ्याचा शेवट सार्वकालिक जीवनात आहे. (१५:१९-२१; रोम २:५-११; ८:५,६,१२-१४). पौलाने आधीच सांगितले आहे की विश्वासूंनी आपला देह वधस्तंभावर चढविला आहे (५:२४). म्हणून जो आपल्या जुण्या स्वभावाला प्रसन्न करतो तो ख्रिस्तात खरा विश्वासू नाही (जरी संभावना असली की विश्वासू वाईट कामात पडेल)

८,९ नंतर नाशाचे पीक कापेल. **जो** पवित्रआत्म्याच्या मार्गदर्शनात चालेल तो सार्वकालिक जीवनाचे पीक कापेल. **चांगले**
१० करण्यात आपण थकू नये कारण जर आपण खचलो नाही तर, निश्चितच समयी पीक दृष्टिस पडेल. **म्हणून** जशी
११ संधि मिळले, सर्वांसोबत चांगला व्यवहार करावा, विशेषकरून त्यांच्याशी जे विश्वासू घराण्याचे आहेत. **मी** आपल्या
१२ हाताने केवढया मोठया-मोठया अक्षराने कशाप्रकारे लिहिले आहे, हे पहा. **ज्या** लोकांना सुंता करावयाची आहे, ते जणू
१३ ख्रिस्ताच्या वधस्तंभामुळे होणाऱ्या छळापासून आपला बचाव करू पाहतात. **जे** लोक सुंता करतात, ते नियमशास्त्राचे
१४ पालन करत नाहीत. ते तुमची सुंता करतात, यासाठी की तुमच्यावर त्यांना गर्व करता यावा, **परंतु** परमेश्वराने असे
करावे की, येशू ख्रिस्त याच्या वधस्तंभाला सोडून इतर कशाची आभिमान मी बाळगू नये; ज्याच्याद्वारे जग मला
१५ वधस्तंभावर चढवलेले आहे; व मी जगाला वधस्तांभावर खिळलेला आहे. **यासाठी** की, सुंता होण्यात व न होण्यात
१६,१७ काहिच अर्थ नाही, फक्त एक नवीन सृष्टि. **त्या** लोकांना जे या नियमानुसार वागतात, शांति व दया असो. **हयापुढे**
१८ कोणीहि मला त्रास न देवो; कारण मी आपल्या शरीरावर येशू ख्रिस्ताच्या खुणा सहन करूत आहे. **भाऊ-बहिणींनो**,
प्रभु येशु ख्रिस्ताची दया तुमच्या आत्म्या बरोबर असो. असेच होवो.

---

सार्वकालिक जीवन असे आहे काय, जे एखादया कामाचा परिणाम होय? पौलाला ठाऊक आहे की हे एक वरदान आहे( रोम ६:२३) परंतु येथे तो दर्शवितो की हे कृपादान एक विशेषजीवन जगल्यावरच प्राप्त होते.(रोम २:७-१०) शी तुलना करा. पौल ''कार्याद्वारे मुक्ति'' असे शिक्षण देत नाही. परमेश्वराच्या आत्म्याने जे जीवन बदलले त्याविषयी तो बोलतो. या जगात ख्रिस्ताचे विश्वासू दूसऱ्या लोकांसारखे नाहीत. केवळ तेच पवित्र आत्म्यासाठी पेरतात.

६:९ **''चांगुलपणा''**-या प्रकारे एक विश्वासू परमेश्वराच्या आत्म्याला प्रसन्न करतो, आणि यावरून सिद्ध होते की परमेश्वराचा आत्मा त्यांच्यात आहे (५:२२). विश्वासू जी चांगली कामे करतात; त्याचे प्रतिफळ त्यांना मिळेल. मत्तय ५:१२; १०:४२; २५:२१; १ कुरिंथ ३:१४;१५:१८; प्रगटी २२:१२. ज्यांना या जगात चांगले कार्य करावयाचे आहे, त्यांना पुष्कळ संधि मिळेल. कद्चित ते खचतील. पौल भविष्यातल्या बक्षिसाविषयी लोकांना उत्साहित करतो.

६:१० **''सर्व''**-म्हणजे सारेच- आमचे शत्रू देखील. (मत्तय ५:४३-४८; लूक ६:३५; रोम १२:२०-२१).

६:११ **''मोठया-मोठया अक्षरात''**-पौलाच्या डोळयाला काही ईजा झाली होती का ज्यामुळे त्याने अक्षरे मोठी काढली? किंवा यासाठी की त्या गोष्टीवर त्याला भर दयावयाचा होता? आपल्याला ठाऊक नाही.

६:१२ तेथील खोटे शिक्षक लोकांना प्रसन्न करण्याच्या प्रयत्नात होते. आपली योग्यता व उत्साह याद्वारे ते यहूदी लोकांपासून सन्मान प्राप्त करण्याची इच्छा बाळगत होते. ते वधस्तंभचे अडखळण सहन करू इच्छित नव्हते (५:११) फक्त 'नावाचे ख्रिस्ती सेवक' प्रसिद्ध होण्यासाठी व छळापासून सुटका करण्यासाठी काहीही करू शकत होते. तुलना करा १:१०.

६:१३ **''पालन''**-रोम २:१७-२,४ एकही खोटा शिक्षक मोशेच्या नियमशास्त्राचे पूर्णपणे पालन करत नव्हता.
**''अभिमान''** - हा गर्व की त्यांनी आपल्याच विचारधारणेचे ख्रिस्ती उत्पन्न केले. आहेत.

६:१४ **''वधस्तंभ''** - गर्वाचा एक आधार होता हा अभिमान स्वत:चा किंवा त्यांने केलेल्या कामाचा नव्हता तर पाप्यासाठी येशूने जे मरण सहन केले त्याचा होता.
तुलना करा रोम ३:२७; इफि २:९ जे लोक पौलाला आदर्श बनवत नाहीत त्या लोकांपासून आपण सावध असावे. असे लोक आपल्या स्वत:वर आणि आपल्या कार्यावर गर्व करतात; त्याचे चरित्र याद्वारे प्रगट होते.
**''वधस्तंभावर खिळलेला''**-२:२०; ५:२४ येथे ''जग'' म्हणजे 'हे वाईट युग (जग)'' १:४ याचा अर्थ म्हणजे दुष्ट जग ते सर्व जे लोकांना आवडते आणि ज्यावर ते गर्व करतात. योहान १:१०; ७:७; १७:१४; रोम १२:२; १ योहान २:१५-१७; ५:१९ शील तुलना करा. या वाईट जगापासून पौलाला काहिच अपेक्षा नाही. त्याच्या करता हे जग मेलेले होते. तो जगासाठी मेलेला होता. जग त्याला मूर्ख समजत होते. येशूच्या मरणामुळे त्याच्यात व जगात एक मोठी दरी होती. ज्या जगाने ख्रिस्ताचा वध केला, त्या जगिक हत्याऱ्यांशी पौलाचे काय देणे-घेणे?
गलतीयांत क्रूसित शब्द विश्वासूंच्या संदर्भात कसा वापरला हे पहा ''ख्रिस्तासोबत वधस्तंभावर खिळला'' (२:२०), शरीराला क्रूसवर खिळले (५:२४) जगासाठी वधस्तंभावर चढवले (६:१४).

६:१५ **''एक नवीन सृष्टि''**-२ करिंथ ५:१७ विशेष गोष्ट आहे व्यक्तिचा आंतरिक बदल-नीवन आत्मिक जीवन रिती-विधी आणि असे धार्मिक नियम नव्हे ज्यांचे पालन यहूदी लोक करत होते. जर आमचा नवीन जन्म (तारणासाठी येशूवर विश्वास) झालेला नाही (योहान ३:३-८) तर बाहेरचा गोष्टीपसून काहीच लाभ नाही. जर आमचा नवा जन्म झाला आहे तर बाहेरील वस्तूंचा स्विकार न करणे आवश्यक आहे.

६:१६ **''हा नियम''**-म्हणजे १४,१५ वचनात दिलेले नियम.''आणि परमेश्वराच्या इस्त्राएलास-इस्त्राएल'' पौलाचे तात्पर्य -ज्यांनी कर्म मार्ग त्यागला आणि ख्रिस्तावर विश्वास ठेवला ते यहूदी आहेत. ते खरे इस्त्राएली आहेत. रोम २:२८,२९, ९:६; ११:१-७. नवीन करारात यहूदी व परराष्ट्रीय विश्वासूंना परमेश्वराचे इस्त्राएल कधीहि म्हटले गेले नव्हते.

६:१७ पौल ख्रिस्ती लोकांना विनंती करतो की त्यांनी त्याच्या शिक्षणाचाच अवलंब करावा. चुकीचे शिक्षण सोडून दयावे आणि त्याला त्रास देऊ नये.
**'येशू ख्रिस्ताच्या खुणा''**-कदाचित तो त्या खुणाकडे इशारा करतो जे ख्रिस्ताची सेवा करतांना त्यांच्या शरीरावर होते. २ करिंथ १:५; ११:२३-२५; कलस्से १:२४.

६:१८ ज्याप्रमाणे पत्राच्या प्रारंभी पौलाने सुरवात केली होती तसेच तो आता ''असीम कृपा'' या शब्दांनीच शेवट देखील करतो. हे यासाठी की त्यांना स्मरण रहावे, की त्यांच्या जीवनातल्या सर्व चांगल्या गोष्टी विशेषकरून ''आत्मिक चांगुलपणा'', हे सर्व ख्रिस्ताच्या मोठया कृपेमुळेच आहे.